

Agatha Christie
वृषाली जोशी
म्युजमधील खून

# म्युजमधील खून

## मूळ लेखिका – अगाथा ख्रिस्ती

## मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# म्युजमधील खून

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

## आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# म्युजमधील खून

लेखिका : अगाथा ख्रिस्ती

अनुवादिका: वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : ९ मे २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अगाथा ख्रिस्ती



अगाथा ख्रिस्ती ही जगातील पुस्तक खपाचा उच्चांक गाठलेली व जिच्या लिखाणावर आधारित असे अनेक नाटक व सिनेमे निघाले, अशी प्रसिद्ध इंग्लिश लेखिका होती. सुमारे शंभर भाषांमध्ये तिच्या पुस्तकांचे अनुवाद झाले.

पहिल्या महायुद्धात ती परिचारिका म्हणून काम करत होती. तिची पहिली कादंबरी 'The Mysterious Affair of Styles' ही १९२० मध्ये प्रकाशित झाली. त्यात तिने हर्क्युल पायरो या गुप्तहेराची निर्मिती केली. पुढे २५ कादंबऱ्यांमध्ये तेच पात्र रहस्ये सोडवत राहिले. 'The Murder of Roger Ackroyd' या १९२६ मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीपासून

मिस जेन मार्पल ही स्त्री गुप्तहेर पुढे आली व त्यापुढील ७५ कादंबऱ्यांमध्ये तीच रहस्ये सोडवत राहिली. Mousetrap [१९५२] हे तिचे नाटक पहिल्यांदा एका थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २१ वर्षे चालले व त्याचे ८८६२ प्रयोग झाले. तर दुसऱ्या थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २०२० सालापर्यंत चालू होते व त्याचे २८००० प्रयोग झाले. 'And then There Were None' यावर आधारित हिंदी सिनेमा 'गुमनाम' तुम्हाला नक्कीच माहिती असेल.

१९२० मध्ये आर्चिबाल्ड ख्रिस्ती या तिच्या नवऱ्याने घटस्फोट मागितला. तेव्हा ती नाहीशी झाली. यथावकाश ती सापडली व तिने १९३० मध्ये पुरातत्वशास्त्रज्ञ सर मॅक्स मॅलोवनशी लग्न केले. तिने अद्भुतरम्य कादंबऱ्याही लिहिल्या. उदाहरणार्थ, Absent in the Spring ही १९४४ मध्ये लिहिलेली कादंबरी.

तिच्या MURDER IN THE MEWS या कादंबरीचा अनुवाद प्रस्तुत पुस्तकात केला आहे.

MURDER IN THE MEWS

# म्युजमधील खून



“सर, मला एखादी पेनी देता का?” एक बुटका मळकट चेहऱ्याचा मोठे हसू हसणारा, लहान मुलगा काही मिळायच्या आशेने बोलला.

मुख्य इन्स्पेक्टर जाप बोलला, “नक्कीच नाही आणि ए मुला, हे बघ–.”

नैतिकतेचे शिक्षण घेणाऱ्या मुलांची लहानशी टोळी आली. चिंध्या पांघरलेला तो मुलगा आरोळी मारत, त्याच्या लहान मित्रांना थोडक्यात पण स्पष्टपणे म्हणाला, “ब्लीमे, हा पोलीस असेल, तर आता आपली गच्छंती झालीच म्हणून समज!”

ती टोळी जादुई शब्द उच्चारत पळून गेली.

*आठवा आठवा पाच नोव्हेंबर*

*देशद्रोही कट आणि बंदुकीची दारू*

*आम्हाला कारण माहिती नाही*

*कशासाठी देशद्रोही बंदुकीची दारू*

*ते कायमचे विसरा,*

मुख्य इन्स्पेक्टरचा छोटासा, वयाने मोठा, अंड्यासारखे डोके असलेला, सैन्यातील लोकांसारख्या मिशा असलेला मित्र स्वतःशीच हसत होता. तो म्हणाला, “छान, जाप. तू मुलांची प्रार्थना चांगली घेतोस. मी तुझे अभिनंदन करतो.”

जाप बोलला, “भीक मागायला बंदी आहे. आज ५ नोव्हेंबर, गाय फॉकनचा दिवस आहे.”

पायरो विचारपूर्वक बोलला, “रुचीपूर्ण जगणे आहे. फट् फट् फटाके फुटत आहेत. बऱ्याच काळाने, ते मान देत असलेला माणूस आणि त्याची कृत्ये विसरली गेली आहेत.”

स्कॉटलंड यार्डचा माणूस बोलला. “असे धरून चालू नका, की त्या मुलांना फॉकन कोण आहे, हे माहिती आहे.”

आणि लवकरच, संशयातीतपणे तिथे विचारांचा गोंधळ असेल. पाच नोव्हेंबरला आतषबाजी ही मान देण्यासाठी आहे, की शापवाणी आहे? इंग्लिश संसद उधळून लावणे, हे पाप आहे की उमदे कृत्य आहे?

जाप गालातल्या गालात हसला.

“काही लोक नक्की म्हणतील की उमदे कृत्य आहे.”

मुख्य रस्त्यापासून वळून, दोन माणसे म्युज मधील तुलनेने शांत रस्त्यावर वळली. त्यांनी एकत्र जेवण घेतले होते आणि आता ते हर्क्युल पायरोच्या सदनिकेसाठी जवळचा रस्ता घेत होते.

ते चालत असतांना, मधून मधून फटाक्यांचा आवाज येत होता. मधूनच पडणाऱ्या सोनेरी पावसाच्या सरींनी आकाश उजळले होते.

जापने व्यावसायिक रुचीने शेरेबाजी केली, “खुनासाठी शुभरात्र. आजच्यासारख्या रात्री कोणालाच बंदुकीचा आवाज ऐकू येणार नाही

पायरो बोलला, “मला हे नेहमी विचित्र वाटते, की गुन्हेगार या गोष्टीचा फायदा घेत नाहीत.”

“पायरो, तुला माहिती आहे का, की मी काही वेळेस अशी इच्छा करतो, तू एखादा खून करावास.”

“अरे मित्रा!”

“हो, मला बघायचे आहे, की तू ते कसे करशील.”

“माझ्या प्रिय जाप, जर मी खून केला, तर तुला मी तो कसा करतो, ते मुळीच बघायला मिळणार नाही --- बहुधा तू सजग पण नसशील. खून झाला, हे तुला समजणारही नाही.”

जाप प्रेमाने व विनोदाने हसला. तो उदारपणाचा आव आणत बोलला, “तू छोटा, धीट राक्षस आहेस, नाही का?

## दोन

दुसऱ्या दिवशी साडेअकरा वाजता, हर्क्युल पायरोचा फोन वाजला. “हॅलो? हॅलो? कोण, पायरो का? “मी जाप बोलतो आहे. आठवते का, काल रात्री आपण म्युजमधील बार्डस्ले बागेतून चाललो होतो?”

‘हो?”

‘आणि आपण बोललो, की फटाके फुटत असतांना, एखाद्या माणसाला बंदुकीने ठार मारणे किती सोपे आहे?”

“नक्कीच.”

‘तर म्युज मध्ये आत्महत्या झाली आहे. क्रमांक १४. एका तरुण विधवेने --- मिसेस अॅलनने, आत्महत्या केली आहे. मी तिथे चाललो आहे. तुला यायला आवडेल का?”

“मला माफ कर. पण प्रिय मित्रा, तुझ्याइतका कीर्तीवान माणसाला कधी आत्महत्येच्या केससाठी पाठवले जाते का?”

“चटपटीत माणूस. नाही --- ती केस तशी नाही. खरे तर आमचा डॉक्टर म्हणाला, की तिथे काहीतरी विनोदी दिसते आहे. तू येशील का? मला वाटते, तू या केसमध्ये लक्ष घालावेस.”

“नक्कीच मी येतो. तू क्रमांक १४ म्हणालास ना?”

“ठीक आहे.”

## तीन

बार्डस्ले बागेतील १४ क्रमांकाच्या घराशी जवळजवळ जाप व इतर तीन माणसे मोटारीतून आली, तेव्हाच पायरोदेखील आला.

तेच ते घर असल्याचे लगेच समजले, कारण ते आकर्षणाचा केंद्रबिंदू झाले होते. तिथे खूप लोकांची गर्दी जमली होती. गाडीचालक, रस्त्यावर फिरणारी मुले, बेकार माणसे आणि तिथून जाणारी चांगल्या पोषाखातील माणसे, १४ क्रमांकाच्या घराशी तोंडे उघडी टाकलेल्या, उत्सुकतेच्या अवस्थेत टकामका बघत होती.

एक पोलीस कॉन्स्टेबल पायरीवर उभा राहून गर्दी ह्टवायचा जास्तीत जास्त प्रयत्न करत होता. जाप आल्याबरोबर, सावध दिसणारी तरुण माणसे कॅमेरा सरसावून तयार होती. त्याना बाजूला करत जाप बोलला, "आता तुमचे काही काम नाही. त्याने पायरोकडे बघून मान हलवली. "तू आलास तर! चल, आपण आत जाऊ."

ते भरभर आत गेले. त्यांच्यामागे दार लावले गेले. एका उंच जिन्याच्या तळाशी ते पोचले.

जिन्याच्या वरील बाजूस असणाऱ्या माणसाने जापला ओळखून म्हटले, "सर, इथे वर या."

जाप आणि पायरोने जिना चढला. जिन्यातील माणसाने डावीकडचे दार उघडले आणि ते एका लहानशा झोपायच्या खोलीत आले.

"सर, मला वाटते, मी महत्वाचे मुद्दे सांगितलेले तुम्हाला आवडतील."

"अगदी बरोबर, जेम्सन, सांग."

स्थानिक इन्स्पेक्टर जेम्सन, गोष्ट सांगू लागला.

“सर मिसेस ॲलन आजारी होती. ती इथे एका मैत्रिणीबरोबर रहायची, मिस प्लेंडरलिथ. मिस प्लेंडरलिथ गावाला गेली होती आणि आज सकाळी आली. तिची किल्ली वापरून, ती आत आली. तिथे कोणालाच न बघून ती आश्चर्यचकित झाली. साधारण नऊ वाजता एक बाई कामाला येत असे. मिस प्लेंडरलिथ प्रथम तिच्या खोलीत गेली [म्हणजे ही खोली.] मग पुढील तिच्या मैत्रिणीच्या खोलीत जाऊ लागली, पण ती आतून कुलुपबंद होती. तिने ते उघडायचा प्रयत्न केला, हाका मारल्या. पण काही उत्तर मिळाले नाही. शेवटी नाईलाजाने तिने पोलीस स्टेशनला फोन केला. ही वेळ पावणेअकराची होती. आम्ही लगेच आलो. दार फोडले. मिसेस ॲलन डोक्यातून गोळी गेलेल्या अवस्थेत जमिनीवर पडली होती. तिच्या हातात पिस्तुल होते --- वेब्ले .२५ --- आणि ही सरळसरळ आत्महत्येची केस दिसत होती.”

“आता मिस प्लेंडरलिथ कुठे आहे?

“ती खाली उठाबसायच्या खोलीत आहे. सर, ती थंड पण कामतत्पर तरुण स्त्री आहे. ती डोकेबाज वाटते.”

“आम्ही आता तिच्याशी बोलतो. मला डॉ ब्रेट आलेला आवडेल.

पायरोबरोबर त्याने त्या खोलीत प्रवेश केला. एका उंच, वयाने मोठ्या माणसाने मान हलवली. “हॅलो, जाप, तुम्हाला इथे बघून बरे वाटले. हा काही विनोदी प्रकार वाटतो.”

जाप त्याच्याकडे सरकला. पायरोने खोलीभर एक शोधक नजर फिरवली. ते आता ज्या खोलीतून आले, त्यापेक्षा ही खूपच मोठी होती.

तिथे एक बाहेर आलेली खिडकी होती. बाकी नेहमीच्या झोपायच्या खोलीसारखी साधी होती. ती म्हणजे झोपायच्या खोलीची उठाबसायची खोली केलेली वाटली. भिंती चंदेरी होत्या आणि छत हिरवे होते. आधुनिक पद्धतीचे चंदेरी हिरवे पडदे होते. दिवाणवर रेशमी हिरवी चादर घातली होती. त्यावर चंदेरी व हिरव्या उशा होत्या. तिथे एक पुरातन, आकर्षक, वॉलनटचे उंच टेबल व खणांची मालिका होती. चकाकणाऱ्या क्रोमियमच्या खूप खुर्च्या होत्या. एका बुटक्या काचेच्या टेबलावर, सिगरेटच्या थोटकांनी भरलेला अॅश ट्रे पडला होता.

पायरोने नाजूकपणे हवा हुंगली. मग तो जाप प्रेताजवळ उभा होता, तिथे गेला.

एका क्रोमियम खुर्चीतून ती सुमारे सत्तावीस वर्षांची तरूण स्त्री जमिनीवर पडली असणार. तिचे केस छान होते आणि अवयव नाजूक होते. चेहऱ्यावर हलकासा मेकप होता. तो सुंदर, पश्चात्तापदग्ध, पण कदाचित थोडा मूर्ख चेहरा होता. डोक्याच्या डाव्या बाजूला रक्त साखळले होते. उजव्या हाताची बोटे लहानशा पिस्तुलाभोवती आवळलेली होती. तिने गळ्यापर्यंत आलेला हिरवा फ्रॉक घातला होता.

"ठीक आहे ब्रेट, काय त्रास आहे?

कशाही गोळा झालेल्या त्या आकृतीकडे जाप खाली बघत होता.

डॉक्टर ब्रेट म्हणाले, "स्थिती ठीक आहे. जर तिने स्वतःला मारून घेतले असेल, तर बहुधा ती खुर्चीतून घरंगळत खाली आली असणार. दार आतून कुलुपबंद होते व खिडकीही आतून घट्ट लावलेली होती.

"ते सगळे ठीक आहे. पण मग काय ठीक नाही आहे?"

“पिस्तुलाकडे बघा. मी त्याला हात लावलेला नाही --- ठसे घेणाऱ्या लोकांसाठी मी थांबलो होतो. पण मला काय म्हणायचे आहे, ते तुम्हाला स्पष्ट दिसेल.”

पायरो आणि जाप दोघेही गुडघ्यांवर बसून पिस्तुल जवळून नीट तपासू लागले.

जाप उठत बोलला, “तुम्हाला काय म्हणायचे आहे, ते माझ्या लक्षात आले. ते तिच्या हाताच्या अर्धवर्तुळात आहे. तिने ते धरले असल्यासारखे दिसते --- पण खरे तर तिने ते धरलेले नाही. अजून काही?”

“खूप काही आहे. तिच्या उजव्या हातात पिस्तुल आहे. आता जखमेकडे बघा. पिस्तुल डाव्या कानाच्या वर, डोक्याजवळ धरलेले पाहिजे होते --- डावा कान बरका.”

जाप बोलला, ‘हं. हे बरोबर वाटत नाही. ती अशा स्थितीत तिच्या उजव्या हातात पिस्तूल धरून मारू शकत नाही का?”

“मी म्हणेन, सरळ वर किंवा खाली मारणे शक्य नाही. तुम्ही तुमचा हात गोल करू शकता. पण मला संशय आहे, की चाप ओढणे कसे काय शक्य होईल?”

“दुसऱ्या कुणीतरी तिला मारले असणार, हे शक्य वाटते. आणि ती आत्महत्या ठरावी, असा प्रयत्न केलेला दिसतो. पण तरी दारखिडकी कुलुपबंद असल्याचे काय?”

इन्स्पेक्टर जेम्सनने त्याचे उत्तर दिले. “खिडकी बंद करून कडी लावली होती, पण दार लावले असले, तरी आपल्याला किल्ली मिळाली नाही.”

जापने मान डोलावली.

“हो, ही बाब महत्वाची आहे. ज्याने कुणी हे केले, त्याने जाताना दार लावले व त्याच्या लक्षात आले नाही, की आत किल्ली सापडली नाही तरी काय होणार!

पायरो पुटपुटला, “माझी स्मरणशक्ती.”

“ओहो, म्हाताऱ्या माणसा, पायरो, तू प्रत्येकाला तुझ्या झगमगत्या बुद्धीने प्रकाशित झालेले समजू नकोस. खरे तर, अशा प्रकारच्या गोष्टी दुर्लक्ष करण्यासारख्या असतात. दार बंद --- लोक ते तोडून आत येतात --- आत बाई मरून पडलेली --- तिच्या हातात पिस्तुल --- ही केस सरळ आत्महत्येची दिसते. तिने दार लावून घेतले व ते केले. त्यांनी किल्लीची शोधाशोध केली नाही. खरे तर पोलिसांना निरोप पाठवणारी मिस प्लेंडरलिथ सुदैवी होती. तिने एकदोघांना बोलावून दार तोडून घेतले असते, तर किल्लीकडे दुर्लक्ष झाले असते.”

पायरो म्हणाला, “तरीही, मला वाटते, ते खरे आहे. ही अनेक लोकांची नैसर्गिक प्रतिक्रिया झाली असती. शेवटचा उपाय म्हणून पोलीस आहेत, नाही का?”

तो अजूनही प्रेताकडे टक लावून बघत होता.

जापने विचारले, “तुला काही खटकते आहे का?” तो प्रश्न तसा निष्काळजी होता. पण त्याचे डोळे सजग व ग्रहणशील होते.

पायरोने सावकाश त्याचे डोके हलवले. “मी तिच्या मनगटावरील घड्याळाकडे बघत होतो.”

त्याने ओणवे होऊन बोटाने त्याला स्पर्श केला. ते नाजुकसे, सुंदर हिऱ्याचे घड्याळ होते. रेशमी काळ्या पट्ट्याने ते पिस्तुल धरलेल्या हाताच्या मनगटावर बांधलेले होते.

जापने ते बघून म्हटले, “मोठी वस्तू आहे. फार महाग असणार. त्यातील कशाची तरी किंमत --- ” त्याने चौकशीच्या सुरात त्याचे डोके पायरोकडे वळवले.

“हो, शक्य आहे.”

पायरो लिहायच्या टेबलाशी उभा राहिला. त्याला पुढील बाजूला खाली पडणारे दार होते. त्याचा रंगदेखील खोलीतील इतर वस्तूंशी मिळताजुळता होता. मध्यभागी चांदीचा शाईचा स्टँड होता. त्यासमोर देखणा हिरवा टीपकागद होता. त्याच्या डावीकडे पाचूसारखा काचेचा पेन ठेवायचा ट्रे होता. त्यात चांदीचा पेनस्टँड होता. हिरवी चिकटमेणाची कांडी, एक पेन्सिल व दोन स्टँप होते. टीपकागदाच्या उजवीकडे हलणारी, तारीख आणि महिना दाखवणारी दिनदर्शिका होती. तिथे काचेचा जगही होता. त्यात आकर्षक हिरवे पिसाचे पेन होते. पायरोला त्या पेनात रुची वाटली. त्याने ते बाहेर काढले व पाहिले. पेन शाईचे नव्हते. ते अर्थात शोभेचे होते --- त्याहून अधिक काही नाही. चांदीच्या पेनस्टँडमध्ये वापर असलेले शाईचे निब होते. त्याचे डोळे दिनदर्शिकेवर स्थिर झाले.

जाप म्हणाला, “मंगळवार, पाच नोव्हेंबर, म्हणजे काल. बरोबर.”

तो ब्रेटकडे वळला. “ती मेल्याला किती वेळ झाला?”

ब्रेट झटपट बोलला, “काल रात्री अकरा तेहेतीसला.”

जापचा आश्चर्यचकित चेहरा पाहून, तो तोंड भरून हसला.

तो म्हणाला, “माफ कर, म्हाताऱ्या, मला अद्भुतरम्य कथेतील महाडॉक्टर व्हावे लागले. अकरा म्हणजे मी जास्तीत जास्त बिनचूक वेळ सांगायचा प्रयत्न करतो आहे --- कदाचित तासभर इकडे तिकडे.”

“मला वाटले मनगटी घड्याळ बंद पडले आहे की काय!”

“ते बंद पडले, ते ठीक आहे. पण सव्वाचारला बंद पडले आहे.”

“आणि मला वाटते, तिला सव्वाचारला मारण्यात आले नसावे.”

“तू ते मनातून पार काढून टाकू शकतोस.”

पायरोने टीपकागदावरील आवरण बाजूला केले.

जाप बोलला, “चांगली कल्पना आहे, पण नशीब नाही.”

तिथे निरागस पांढरा टीपकागद होता. पायरोने उलटून बघितले. पण ते सर्व तसेच होते.

त्याने त्याचे लक्ष कचऱ्याच्या बादलीकडे वळवले. त्यात फाडून टाकलेली एकदोन पत्रे होती. ती एकदाच फाडलेली असल्याने जुळवून वाचता येत होती. तीन नोव्हेंबरच्या कॉकटेल पार्टीचे आमंत्रण, सेवाव्यतिरिक्त कर्मचाऱ्यांसाठी कुठल्यातरी समाजाकडून पैशांची मागणी, शिंप्याची घेतलेली वेळ, एका मोठ्या दुकानातील मालाची सूची.

जाप बोलला, “त्यात काही नाही.”

पायरो म्हणाला, “हे विचित्र आहे.”

“म्हणजे तुला म्हणायचे आहे, की जेव्हा आत्महत्या केली जाते, तेव्हा सहसा मागे पत्र ठेवले जाते.”

“बरोबर.”

“म्हणजे, अजून एक पुरावा, की ती आत्महत्या नव्हती.”

तो निघून गेला.

“मी माझ्या माणसांना कामाला लावले आहे. आपण खाली जाऊन, मिस प्लेंडरलिथची मुलाखत घेऊया. पायरो, येतोस का?”

पायरोला अजून लिखाणाच्या जागेत व पत्रांमध्ये रुची वाटत होती.

खोली सोडता सोडता त्याची नजर पुन्हा त्या सुंदर पिसाच्या पेनावर पडली.

## चार

अरुंद जिन्याच्या तळाला असणारे दार आकाराने मोठ्या उठाबसायच्या खोलीत उघडत होते --- खरे तर, तो आधीचा गोठा होता. त्याच्या भिंती ओबडधोबड गिलावा केलेल्या होत्या. त्यावर आम्लाचा थर दिला होता व लाकडांचे तुकडे बसवले होते. तिथे दोन लोक बसले होते.

एकजण शेकोटीजवळील खुर्चीत बसली होती. तिचा हात ज्वाळांकडे ताणलेला होता. ती काळी, सक्षम दिसणारी तरुण स्त्री होती. सत्तावीस अठ्ठावीसची असेल. दुसरी वयाने जरा मोठी व जाडी होती. तिच्याकडे काड्यांची बॅग होती. ती धापा टाकतांना बोलत होती. तेव्हा दोन माणसे तिथे शिरली.

“ --- मिस, मी म्हणाले तसे, मला इतका हिसका बसला, की मी जिथे उभी होते, तिथून कोलमडणारच होते. मला वाटते, सगळ्या सकाळींमध्ये आजची सकाळ --- “

दुसऱीने तिचे बोलणे तोडले.

“मिस पिअर्स, ते चालेल. मला वाटते, ही सभ्य माणसे पोलीस ऑफिसर्स आहेत.

जाप पुढे जात बोलला, “मिस प्लेंडरलिथ?”

त्या मुलीने मान हलवली. “ते माझे नाव आहे. ही मिसेस पिअर्स आहे. ती रोज इथे कामाला येते.”

आवरता न येणारी मिसेस पिअर्स परत शोक करू लागली.

“आणि मी मिस प्लेंडरलिथला सांगत होते, की आजची सकाळ रोजच्या सकाळसारखी नव्हती. माझ्या बहीणीने, लुईसा मॉडने खूप रागवायला हवे होते. आणि मी एकटीच हाताशी होते. मी म्हणते, मास आणि रक्त हे मास आणि रक्त आहे., जरी मला माझ्या मालकिणींना नाराज करायला आवडत नाही, तरी पण मला वाटत नाही, की मिस ॲलनला काही वाटेल.”

जाप कार्यतत्परतेने आला. “मिसेस पिअर्स, बरोबर आहे. आता कदाचित तुम्ही इन्स्पेक्टर जेम्सनला स्वयंपाकघरात घेऊन जा आणि तिथे तुमचा जबाब द्या.”

बडबड्या मिसेस पिअर्सपासून सुटका करून घेतल्यावर, जापने त्या मुलीवर पुन्हा लक्ष केंद्रित केले.

“मी मुख्य इन्स्पेक्टर जाप आहे. आता, मिस प्लेंडरलिथ, तुम्हाला या घटनेबद्दल जेवढे काही माहिती आहे, ते सगळे तुम्ही मला सांगा.”

“नक्की. सुरवात कुठून करू?”

तिचा स्वतःवरील ताबा कौतुकास्पद होता. कुठेही दुःखाची वा धक्का बसल्याची चिन्हे नव्हती. फक्त तिच्या पद्धतीत अनैसर्गिक कृत्रिमपणा होता.

"तुम्ही आज सकाळी इथे किती वाजता आलात?"

"मला वाटते, साडेदहाच्या थोडे आधी. मला असे आढळले, मिसेस पिअर्स, ती खोटारडी इथे नव्हती --- "

"हे नेहमी घडते का?"

जेन प्लेंडरलिथने खांदे शहारवले.

"आठवड्यातून दोनदा बारा वाजता, ती येते – किंवा येतच नाही. तिची यायची वेळ खरे तर नऊ आहे. खरे तर, मी म्हणते तसे, ती आठवड्यातून दोनदा येते किंवा येत नाही. कधीकधी तिच्या कुटुंबातील कोणी आजारी असते. या सगळ्या कामवाल्या अशाच! येतील किंवा येणार नाहीत. पण ती इतकीही वाईट नाही."

"ती इथे खूप दिवस आहे का?"

"फक्त एक महिना. आमची आधीची होती, ती चोऱ्या करायची.

"पुढे सांगा, मिस प्लेंडरलिथ."

"मी टॅक्सीचे पैसे भरले. माझी बॅग आत नेली. मिसेस पिअर्सला शोधले. पण ती सापडली नाही. मी थोडी आवराआवरी केली. आणि मग बर्बाराकडे गेले --- मिसेस ॲलन --- मला तिच्या खोलीचे दार कुलुपबंद दिसले. मी ते उघडायचा प्रयत्न केला. दार वाजवले. पण काही उत्तर मिळाले नाही. मी खाली येऊन पोलीस स्टेशनला फोन केला."

पायरोने झटपट एक कसबपूर्ण प्रश्न विचारला, “गर्दीतील एखाद्या दुसऱ्या चालकाच्या मदतीने, तुम्ही दार तोडण्याचा प्रयत्न का केला नाही?” तिचे डोळे त्याच्याकडे वळले --- थंड, करडे हिरवे डोळे. तिने लगेच नजर दुसरीकडे वळवली.

“नाही, मी असा काही विचार केला नाही. जर काही नको ते घडले असेल, तर पोलीस आलेलेच बरे, असे मला वाटले.”

“बाईसाहेब, म्हणजे तिथे काही नको ते घडले आहे, असे तुम्हाला वाटले?

“अर्थात.”

“कारण तुम्ही दारावर मारलेल्या थापांना उत्तर मिळाले नाही. पण तुमच्या मैत्रिणीने झोपेची गोळी वगैरे घेतली असेल, तर --- “

“ती झोपेच्या गोळ्या घेत नसे.” हे उत्तर ठामपणे आले.

“किंवा ती खोली बंद करून, कुठे बाहेर गेली असेल, तर?

‘पण मग तिने खोली कुलुपबंद केली नसती. असे काही असते, तर तिने मला चिठ्ठी लिहून ठेवली असती.”

“म्हणजे तिने तुम्हाला चिठ्ठी लिहून ठेवलेली नव्हती? याबद्दल तुमची खात्री आहे?”

“हो, अर्थात माझी खात्री आहे. मला ती लगेच दिसली असती.” तिच्या आवाजाची तीव्रता मोठी होती.

जाप म्हणाला, “तुम्ही किल्लीच्या भोकातून बघण्याचा प्रयत्न केला नाही का?”

जेन प्लेंडरलिथ विचारपूर्वक म्हणाली, “नाही, मला असे वाटलेच नाही. पण मला काहीही दिसू शकले नसते. दिसले असते का? कारण किल्ली त्या भोकात असायला हवी होती?”

तिच्या चौकस, निरागस, डोळे विस्फारलेल्या दृष्टीमुळे जाप व पायरोला अचानक हसू आले.

जाप बोलला, “मिस प्लेंडरलिथ, तुम्ही अगदी बरोबर केले. तुमची मैत्रीण आत्महत्या करणार असल्याची, तुम्हाला सुतराम कल्पना नसणार, नाही का?

“ओहो, अजिबात नाही.”

“ती काळजीत वगैरे दिसत होती का? किंवा कुठल्या कारणाने उदास होती का?”

त्या मुलीने उत्तर देण्यापूर्वी बराच वेळ घेतला. “नाही.”

“तिच्याकडे पिस्तुल असल्याचे तुम्हाला माहिती होते का?

जेन प्लेंडरलिथने मानेने नकार दर्शवला. “पण हो, भारतात ते तिच्याजवळ होते. ती ते नेहमी तिच्या खोलीतील खणात ठेवत असे.”

“हं, त्याचे परवानापत्र तिच्याकडे होते?”

“मला वाटते, होते. पण माझी खात्री नाही.”

“मिस प्लेंडरलिथ, आता मला तुमची किती वर्षांची ओळख आहे, तिचे नातेवाईक कोण आहेत, तुम्हाला मिसेस ॲलनबद्दल जे जे माहिती आहे, ते सगळे सांगा.

जेन प्लेंडरलिथने मान हलवली.

“मी बार्बाराला गेली पाच वर्षे ओळखते. मी परदेशी प्रवास करतांना ती मला प्रथम भेटली. इजिप्तमध्ये. ती भारतातून आली होती. मी अथेन्स येथील ब्रिटीश कॉलेजमध्ये काही काळ होते. आणि घरी जाण्यापूर्वी काही काळ इजिप्तमध्ये गेले होते. आम्ही नाईल नदीच्या सफरीवर एकत्र होतो. आमची मैत्री झाली व आम्ही एकमेकींना आवडलो. बार्बारा जगात एकटीच होती. आम्हाला वाटले आमचे एकत्र चांगले जमेल.”

पायरोने विचारले, “आणि तुमचे चांगले जमले?”

“फारच छान. आमच्यापैकी प्रत्येकीला स्वतःचे मित्रमैत्रिणी होते. बार्बारा जास्त समाजप्रिय होती. माझे मित्रमैत्रिणी कलाकार नव्हते. तसे जास्त बरे पडते.”

पायरोने मान हलवली. जाप पुढे बोलला, “तुम्ही भेटण्यापूर्वी मिसेस ॲलनचे आयुष्य व कुटुंब, याबद्दल तुम्हाला काय माहिती होती?

जेन प्लेंडरलिथने खांदे उडवले.

“खरे तर विशेष काही नाही. मला वाटते, तिचे मधले नाव आर्मीटेज होते.”

“तिचा नवरा?”

“मला वाटत नाही, की त्याच्या घरचे काही सांगण्यासारखे होते. मला वाटते, तो प्यायचा. मला वाटते, तो लग्नानंतर एकदोन वर्षात मेला. त्याना लहान मुलगी होती. ती तीन वर्षांची असतांना वारली. बार्बारा नवऱ्याबद्दल फारसे बोलत नसे. मला वाटते, ती सतरा वर्षांची असतांना, त्यांचे लग्न भारतात झाले. मग ते बोर्नियाला किंवा देवाने पाठवलेल्या

एखाद्या ठिकाणी गेले. तिथे त्यांचे काही फार बरे चालले नसावे --- हा दुःखद विषय असल्याने, मी तो फारसा काढत नसे.”

“मिसेस ॲलन काही आर्थिक अडचणीत होती, असे तुम्हाला वाटते का?”

“नाही. माझी खात्री आहे, तसे काही नव्हते.”

“कर्ज वगैरे --- तशा प्रकारचे काही?”

“नाही. नाही. तशा प्रकारच्या काही अडचणीत ती नव्हती.”

“आता एक प्रश्न मी विचारलाच पाहिजे --- मिस प्लेंडरलिथ, मला आशा आहे की त्यामुळे तुम्ही नाराज होणार नाही. मिसेस ॲलनला कुणी पुरुष मित्र होते का?”

जेन प्लेंडरलिथ थंडपणे म्हणाली, “तिचे लग्न ठरले होते.”

“त्याचे नाव काय होते?”

चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्ट. तो हँपशायर येथे संसद सभासद होता.”

“ते खूप वर्षे एकत्र होते का?”

“सुमारे वर्षभर असेल.”

“आणि त्यांचा साखरपुडा कधी झाला होता?”

“दोन --- नाही जवळजवळ तीन महिन्यांपूर्वी.”

“तुम्हाला माहिती आहे, त्याप्रमाणे काही भांडण झाल्याचे कानावर होते का?”

मिस प्लेंडरलिथने मान हलवली. “तसे काही झाले असेल, तर मला नवल वाटेल. बार्बारा भांडणारी नव्हती.”

“तुम्ही मिसेस ॲलनला शेवटचे कधी पाहिलेत?

“शुक्रवारी, मी शनिवार रविवारी बाहेर गेले तेव्हा.”

“मिसेस ॲलन घरीच होती?”

“हो. मला वाटते, ती तिच्या ठरलेल्या नवऱ्याबरोबर रविवारी बाहेर जाणार होती.”

आणि तुम्ही कुठे गेला होतात?”

“लेडेल्स हॉलमध्ये. इसेक्स इथे.”

“आणि तुम्ही कुणाबरोबर होतात?”

“मिस्टर आणि मिसेस बेन्टीन्क.”

“तुम्ही तिथून आज सकाळी निघालात?”

“हो.”

“तुम्ही सकाळी लवकर निघाला असाल?’

“मिस्टर बेन्टीन्क मला मोटारीने घेऊन गेले. आम्ही लवकर निघालो, कारण त्याना गावात दहाला पोचायचे होते.”

“अस्स.”

जापने सर्व काही समजून मान हलवली. मिस प्लेंडरलिथने सर्व उत्तरे पटतील अशी दिली.

पायरोने अजून एक प्रश्न विचारला, “मिस्टर चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्टबद्दल, तुमचे काय मत झाले?”

त्या मुलीने खांदे शहारवले.

“ते कारण असू शकेल का?”

“कदाचित ते नसेल. पण तुम्ही तुमचे मत बनवू शकता.”

“मी त्याच्याबद्दल उलटसुलट मते बनवली होती. तो तरुण आहे. एकतीस बत्तीसपेक्षा जास्त मोठा नसेल --- महत्वाकांक्षी आहे --- उत्तम भाषणे देऊ शकतो --- जगाशी त्याचे चांगले जमते.”

“हे गुणवर्णन झाले. अवगुणांचे काय?”

“तिने एकदोन मिनिटे विचार केला. “माझ्या मते, तो सर्वसाधारण आहे --- त्याच्या कल्पना फारशा स्वयंभू नाहीत. तो थोडा पोकळ डौल मिरवणारा आहे.”

पायरो हसत म्हणाला, “बाईसाहेब, हे काही फार गंभीर अवगुण नाहीत.

“तुम्हाला असे वाटत नाही का?” तिचा सूर थोडा विरोधभासात्मक होता.

“तुमच्या दृष्टीने तसे असेल.”

तो तिचे निरीक्षण करत होता. ती थोडी गोंधळलेली दिसत होती. त्याचा फायदा घेण्याचा त्याने विचार केला.

“पण मिसेस ॲलनला --- नाही, तिला ते तसे जाणवले नसतील.”

“तुमचे एकदम बरोबर आहे. बार्बाराला तो नवलपूर्ण वाटला --- तिने त्याला पूर्णपणे तो आहे तसे, स्विकारले होते.”

पायरो म्हणाला, “तुम्हाला तुमच्या मैत्रिणीचा लळा होता?”

त्याने पाहिले, की तिचा हात, गुडघ्यावर घट्ट झाला आहे. जबडा दाबला गेलेला आहे. तरी उत्तर भावनारहित आले.

“तुमचे बरोबर आहे. मला तिचा लळा होता.”

जाप बोलला, “अजून एक गोष्ट, मिस प्लेंडरलिथ. तुमचे आणि तिचे कधी भांडण झाले नाही? किंवा रुसणेफुगणे झाले नाही?”

“कधीच नाही.”

“या साखरपुड्याच्या विषयावरून नाही?”

“नक्कीच नाही. ती त्याबद्दल इतकी आनंदी असल्याचे बघून, मला बरे वाटले.”

क्षणभर शांतता पसरली. मग जाप म्हणाला, “तुम्हाला जितके माहिती आहे, त्यानुसार मिसेस ॲलनला कुणी शत्रू होते?”

यावेळेस जेन प्लेंडरलिथने उत्तर देण्यापूर्वी, बराच वेळ घेतला. तिचा आवाजही बदलला. “तुम्ही काय म्हणत आहात मला नीटसे कळले नाही. शत्रू म्हणजे कोण?”

“कोणीही, उदाहरणार्थ, तिच्या मरणाने ज्याचा फायदा होणार आहे, असा कोणीही.”

“ओहो, नाही. ते फारच विचित्र ठरेल. तसेही तिचे उत्पन्न फार नव्हते.”

“तिचा वारसा कुणाकडे जाणार आहे?”

“मला खरेच माहिती नाही. मला माहिती असेल, तरच नवल आहे. तिने इच्छापत्र बनवलेच नव्हते.”

“दुसऱ्या कुठल्या अर्थानेदेखील शत्रू नव्हते?” जाप लगेच दुसऱ्या बाबीकडे वळला. “लोक तिच्यावर खार खाऊन होते का?”

“मला तसे वाटत नाही. ती फार सभ्य बाई होती, नेहमी आनंदी रहायला उत्सुक असायची. तिचा स्वभाव प्रेमळ व गोड होता.”

पहिल्यांदाच तो जेवढ्यास तेवढा आवाज गलबलला. पायरोने मान हलवली.

जाप बोलला, “म्हणजे असे दिसते --- मिसेस ॲलन अलीकडे चांगल्या मनस्थितीत होती. तिला काही आर्थिक त्रास नव्हता. तिचा साखरपुडा झाला होता व ती आनंदी होती. मग तिने आत्महत्या करायचे काही कारण दिसत नव्हते. काय, बरोबर आहे ना?”

जेन काही बोलण्यापूर्वी परत एकदा शांतता पसरली. “हो.”

जाप उठला. “मला माफ करा. मला इन्स्पेक्टर जेम्सनशी थोडे बोलायचे आहे.”

“हो.”

त्याने खोली सोडली.

पायरो आणि मिस जेन प्लेंडरलिथ दोघेच उरले.

## पाच

पाच मिनिटाच्या शांततेनंतर, जेनने त्या छोट्या माणसाकडे एक कटाक्ष टाकला. पण नंतर ती तिच्यासमोर बघू लागली व काही बोलली नाही. तरी त्याच्या तिथे हजर असण्याचे दडपण तिच्यावर असल्याचे दिसत होते. ती अजून मनमोकळी वाटत नव्हती. शेवटी पायरोने शांततेचा भंग करत, त्याच्या आवाजातून तिला थोडा दिलासा दिला. रोजच्यासारख्या आवाजात त्याने प्रश्न केला, “बाईसाहेब, तुम्ही शेकोटी केव्हा पेटवली?”

“शेकोटी?” तिचा आवाज लक्ष नसल्यासारखा व असातसा येत होता. “मी सकाळी इथे आल्याबरोबर.”

“तुम्ही वर जाण्यापूर्वी, की आधी?

“आधी.”

“अस्स. हो. साहजिक आहे --- आणि ती आधीच पेटवलेली होती --- की तुम्हाला ती पेटवावी लागली?”

“ती आधीच तयार केलेली होती. मी फक्त काडी ओढली.”

तिच्या आवाजात थोडी अधीरता होती. तिला त्याच्या संभाषणाचा संशय आला. बहुतेक तो तेच करत होता. काही झाले तरी त्याने शांतपणे संभाषण चालू ठेवले.

“पण तुमच्या मैत्रिणीच्या खोलीत तर मी फक्त गॅसची शेकोटीच पाहिली?

जेनने यांत्रिकतेने उत्तर दिले, ”इथे ही एवढीच कोळशाची शेकोटी आहे. बाकी सर्व ठिकाणी गॅसची शेकोटी आहे.”

“स्वयंपाकाला देखील गॅसच आहे का?”

“हो, तो तर हल्ली प्रत्येकाकडे असतो.”

“खरे आहे. त्यामुळे त्रास वाचतो.”

ते लहानसे संभाषण संपले. जेनने बुटाने जमिनीवर ताल धरला. मग अचानक ती बोलली, “मुख्य इन्स्पेक्टर जाप --- हुशार आहे का?”

“हो, तो खूप हुशार आहे. हो तो चांगला विचार करू शकतो. तो खूप मेहनत घेतो आणि फार थोडे त्याच्या नजरेतून सुटते.”

मुलगी म्हणाली, “मला आश्चर्य वाटते --- “

पायरो तिचे निरीक्षण करत होता. शेकोटीच्या उजेडात त्याचे डोळे खूप हिरवे दिसत होते. त्याने शांतपणे म्हटले, “तुमच्या मैत्रिणीच्या आत्महत्येमुळे तुम्हाला मोठा धक्का बसला का?”

“भयंकर मोठा.” ती विचित्र सच्चेपणे म्हणाली.

“तुमची अशी अपेक्षा नव्हती --- नव्हती ना?”

“अर्थात नव्हती.”

“म्हणजे पहिल्यांदा तुम्हाला हे अशक्य वाटले असेल --- असे होणे शक्यच नाही असे वाटले का?”

त्याच्या आवाजातील सहानुभूतीचा स्वराने जेन प्लेंडरलिथचे संरक्षण गळून पडले. तिने घाईने कडकपणा न करता नैसर्गिकपणे उत्तर दिले, “ते तसेच झाले. जरी बर्बाराने स्वतःला मारून घेतले असले, तरी तिने तसे करावे, अशी कल्पना मी करू शकत नाही.”

“पण तरी तिच्याकडे पिस्तुल होते?”

जेन प्लेंडरलिथने अधीर हालचाली केल्या.

“हो, पण ते पिस्तुल --- ओहो, ! डोकेदुखी. ती अनेक ठिकाणी जात असे. ते सवयीने तिच्याजवळ असे --- बाकी काही नाही --- त्याबद्दल माझी खात्री आहे.”

“आणि तुमची तशी खात्री का आहे?

“तिच्या तोंडच्या वाक्यांमुळे.”

ती काय म्हणाली होती?” त्याचा आवाज मित्रत्वाचा आणि हळूवार होता. त्यामुळे ती जणू शरण आली.

“ठीक आहे. उदाहरणार्थ, आम्ही एकदा आत्महत्येबद्दल बोलत होतो. ती म्हणाली की, गॅसच्या सर्व चाव्या सोडून झोपून जायचे. मी म्हटले, असे मरणाची वाट बघत झोपून रहाणे, अशक्य आहे. त्यापेक्षा पिस्तुलाच्या गोळीने स्वतःला ठार मारणे, मी पसंत करेन. तेव्हा ती म्हणाली, नाही, तिला कधीच स्वतःला मारून घेणे शक्य होणार नाही. असे करायला, ती फार घाबरेल. मरायला झालेच नाही तर! आणि तसेही ती आवाजाला फार घाबरत असे.”

पायरो म्हणाला, “अस्स. तुम्ही म्हणता, तसे असेल तर ही घडलेली गोष्ट विचित्र आहे --- कारण आताच तुम्ही सांगितल्याप्रमाणे, खोलीत गॅसचा स्फोट झाला होता.”

जेनने चमकून त्याच्याकडे पाहिले. “हो, तिथे झाला होता --- मला काही समजत नाही. मला काही समजत नाही. तिने तसे का केले नाही?”

पायरोने डोके हलवले. “हो, हे विचित्र वाटते. काहीतरी अनैसर्गिक वाटते.”

“ही सर्व गोष्ट नैसर्गिक वाटत नाही. तिने स्वतःला मारून घेतले, हे मला अजून खरे वाटत नाही. ती आत्महत्या असावी की नाही?”

“अजून एक शक्यता दिसते आहे.”

“तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

पायरोने सरळ तिच्याकडे पाहिले. “तो --- खून असू शकेल.”

जेन मागे झाली. “ओहो, नाही. तुम्ही काय भयंकर सुचवत आहात!”

“कदाचित भयंकर, पण तुम्हाला ते अशक्य वाटायचे काही कारण नाही, नाही का?”

“पण दार व खिडकी आतून बंद होते.

“दार कुलुपबंद होते, बरोबर आहे. हो. पण ते बाहेरून बंद केले होते, की आतून कुणास ठाऊक? कारण किल्ली सापडत नाही आहे.”

“जर ती सापडत नसेल, तर --- “ ती मिनिटभर थांबली. तर मग ते बाहेरून लावले असणार. नाहीतर, ती खोलीत कुठेतरी सापडली असती.”

“पण असेही असेल, की अजून खोली नीट तपासली गेली नसेल. आठवा. किंवा ती खिडकीतून बाहेर टाकली गेली असेल. आणि कोणीतरी ती घेऊन गेले असेल.”

जेन प्लेंडरलिथ म्हणाली, “खून! तिचा काळा, हुशार, सेंट लावलेला चेहरा त्या शक्यतेमुळे उत्सुक बनला होता. “मला वाटते, तुमचे बरोबर आहे.”

“पण तो खून असेल, तर काही हेतू पाहिजे. तुम्हाला काही हेतू माहिती आहे का?”

तिने हळूहळू मान हलवली. आणि नकार देत असूनही, पायरोला परत असे वाटले, की ती मुद्दाम काही लपवते आहे. दार उघडून जाप आत आला.

पायरो उठला. तो म्हणाला, ‘मी मिस प्लेंडरलिथला असे सुचवत होतो, की तिच्या मैत्रिणीचा मृत्यू ही आत्महत्या नाही.”

क्षणभर जाप अवाक झाला. त्याने पायरोकडे विचारपूर्वक दृष्टीक्षेप टाकला. त्याने म्हटले, “काही ठामपणे सांगणे, थोडे लवकर होते आहे. आपल्याला सर्व शक्यता लक्षात घेतल्या पाहिजेत, समजले का? या क्षणी काही सांगणे कठीण आहे.”

जेन प्लेंडरलिथ शांतपणे उत्तरली, “मी बघते.”

जाप तिच्याकडे चालत आला. “मग आता मिस प्लेंडरलिथ, तुम्हाला यापूर्वी अशी शक्यता वाटली होती का?”

त्याच्या तळहातावर, लंबवर्तुळाकार अर्धपारदर्शक चकाकीत निळी वस्तू होती.

जेनने डोके हलवले. “नाही, कधीच नाही.”

“ही तुमची नाही आणि मिसेस ॲलनची पण नाही?”

“नाही. सहसा असली वस्तू बायका वापरत नाहीत, नाही का?”

“नाही. कधीच नाही.”

ओहो, तुम्ही ती ओळखली.”

“ओहो, ती छानच आहे, नाही का? ती पुरुषांच्या कफलींकच्या अर्ध्या आकाराची आहे.

## सहा

जापने तक्रार केली, “ती तरुण बाई अर्धी धीट आहे.”

ते दोघे परत मिसेस ॲलनच्या झोपायच्या खोलीत गेले. प्रेताचे फोटो काढून ते हलवले गेले होते. ठसे घेणाऱ्या माणसाने त्याचे काम केले व तो गेला.

पायरोने कबूल केले, “तिला मूर्ख समजणे, शहाणपणाचे ठरणार नाही. हे स्पष्टपणे दिसते आहे, की ती मूर्ख नाही. खरे तर ती हुशार आणि क्षमता असलेली बाई आहे.”

जापने आशेचा किरण आजमावत विचारले, “तिने हे केले असावे का? कदाचित केलेही असेल. आपल्याला तिच्याबाबतीतला पुरावा गोळा करायला पाहिजे. या तरुण माणसाच्या बाबतीत काही भांडण --- हा संसद सभासद असलेला माणूस. मला वाटते, ती त्याच्या बाबतीत जरा नाराजच आहे. पण याची खात्री वाटत नाही. कारण ती स्वतःच त्याच्यावर भाळली होती पण त्याने तिला धुडकावून लावले. तिला जर एखाद्याबद्दल काही वाटले, तर त्याला सरळ बुकलून काढेल. आणि हे करतांना डोके ठिकाणावर ठेवेल. हो, आपल्याला तो पुरावा पहायला पाहिजे. ती आधी थोपटेल आणि मग शेवटी, इसेक्स काही लांब नाही. खूप गाड्या आहेत. किंवा जलद मोटार. काल रात्री ती डोके दुखत असतांना झोपायला गेली का, हे शोधून काढायला पाहिजे.”

पायरोने कबूल केले, “तुमचे बरोबर आहे.”

जापने चालू ठेवले, “काही झाले तरी, ती आपल्यावर अवलंबून आहे. नाही का? तुलाही असे वाटते ना? त्या तरुण स्त्रीला काहीतरी माहिती आहे.”

पायरोने विचारपूर्वक मान डोलावली. “हो, ते स्पष्ट दिसत होते.”

जाप तक्रार करत म्हणाला, “अशा केसमध्ये नेहमी अशी अडचण असते. लोक पटापट बोलत नाहीत --- त्यामागे कधीकधी चांगले हेतू असतात.”

“माझ्या मित्रा, त्यासाठी आपण त्यांना क्वचितच दोष देऊ शकतो.”

जाप गुरगुरला, पण त्यामुळे आपले काम कठीण होऊन बसते.”

पायरो सांत्वनपर बोलला, “तुमच्या हुशारीला यात भरपूर वाव असतो. ठशांचा अहवाल आला का?”

“तो खून आहे, यात काही शंका नाही. पण पिस्तुलावर ठसे सापडले नाहीत. तिच्या हातात ठेवण्यापूर्वी ते साफ केले गेले असावेत. जरी तिने तिचा हात डोक्याभोवती गुंडाळल्यासारखा ठेवणे कसेतरी जमवले, तरी तिला तशा अवस्थेत पिस्तुलाचा खटका ओढणे शक्य नाही. मेल्यावर, ते पिस्तुल साफ करणेही तिला शक्य नाही.”

“नाही. नाही. कुणी बाहेरील व्यक्तीने खून केला, हे नक्की.”

“ठशांनी नाराज केले. दाराच्या हँडलवर वा खिडकीवरही ठसे नाहीत, हे सूचक वाटते. पण मिसेस ॲलनचे ठसे जागोजागी आहेत.”

“जेम्सनला काही सापडले का?”

“रोज येणाऱ्या बाईकडून? नाही. ती खूप बोलली. पण खरे तर तिला काही माहिती नाही. एवढे मात्र समजले की ॲलन आणि प्लेंडरलिथ यांचे

चांगले जमायचे. मी जेम्सनला म्युजमध्ये बाहेर पाठवून काही माहिती मिळते का, हे पाहिले. आपल्याला मिस्टर चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्टलादेखील भेटले पाहिजे. ही गोष्ट घडली, तेव्हा तो कुठे होता आणि काल रात्री तो काय करत होता, हे शोधून काढायला पाहिजे. मधल्या काळात आपण तिची कागदपत्रे तपासू.”

“जेम्सनला काही सापडले का?”

त्याने थोड्या रागातच सुरवात केली. प्रसंगवशात तो पायरोला काही दूषणे देत होता. त्याचा शोध फार काळ चालला नाही. खणात फार कागदपत्रे नव्हती. जी होती, ती व्यवस्थित लावलेली व पाकीटबंद होती.

शेवटी जाप मागे टेकून बसला व त्याने एक सुस्कारा सोडला.

“त्यात काही विशेष नाही?”

“बरोबर.”

“त्यातले बरेचसे सरळ दिसते आहे ---बिलांच्या रिसीट, अजून भरायची काही बिले --- काही विशेष असे नाही. सामाजिक कागदपत्रे --- आमंत्रणे. ही मित्रांची पत्रे --- त्याने सात आठ पत्रांच्या गठ्ठ्यावर हात ठेवला --- आणि तिचे चेकबुक आणि पासबुक. तुला काही वेगळे असे आढळले का?”

“हो, तिने खात्यात जेवढे पैसे होते, त्यापेक्षा जास्त काढले आहेत.”

“आणि काही?”

पायरो हसला. “तू मला परीक्षेला बसवतो आहेस का? पण हो, मला जाणवले, की तुला काय वाटते आहे. तीन महिन्यांपूर्वी स्वतःच्या नावावर काढलेले दोनशे पौंड --- आणि काल काढलेले दोनशे पौंड --- “

“आणि चेकबुकच्या कॉउंटरफॉइलला काही नाही. स्वतःच्या नावावर काढलेल्या इतर रकमा किरकोळ आहेत त्यातील सर्वात जास्त पंधरा पौंड आहे. तुला सांगतो --- घरात फारसे पैसे नाहीत. एका पर्समध्ये चार पौंड दहा शिलिंग होते आणि एखाददोन शिलिंग दुसऱ्या बॅगेत होते. मला वाटते, एवढे स्पष्ट झाले.”

“म्हणजे तिने काल कुणाला तरी पैसे दिले.”

“हो, पण कुणाला दिले?

दार उघडून इनस्पेक्टर जेम्सन आत आला.

“काय जेम्सन, काही सापडले का?”

“हो, सर, खूप गोष्टी. सुरवातीला कोणीच गोळीचा आवाज ऐकला नव्हता. दोनतीन बायका म्हणाल्या, की त्यांनी तो आवाज ऐकला, कारण त्याना तसे वाटले. पण तेवढेच. फटाके फुटत असतांना तो आवाज कुणाला ऐकू जाणे शक्य नव्हते.”

जाप खाखरला. “असे समजू नकोस, तो कुणी ऐकला नाही. पुढे सांग.”

“मिसेस ॲलन काल दुपारी व संध्याकाळी घरीच होती. साधारण पाच वाजता आली. मग परत सहा वाजता म्युजच्या टोकाला असलेल्या पोस्टात ती गेली. साडेनऊला एक मोटार आली --- स्टँडर्ड गाडी --- त्यातून एक माणूस उतरला. साधारण पंचेचाळीस वयाचा, गडद निळा ओव्हरकोट घातलेला, डोक्यावर टोपी, टूथब्रशसारख्या मिशा. सैन्यात असल्यासारखा दिसणारा, जेम्स हॉग. १८ क्रमांकाचा गाडीचालक म्हणाला त्याने पूर्वीदेखील त्याला मिसेस ॲलनला हाका मारतांना पाहिले आहे.”

जाप बोलला, “पंचेचाळीस वयाचा, मग तो चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्ट नसावा.”

“हा मनुष्य, जो कुणी होता तो, फक्त एक तास राहिला. साधारण दहा वीसला घराबाहेर पडला. दारात उभा राहून मिसेस ॲलनशी बोलला. एक छोटा मुलगा फ्रेडरिक हॉग अगदी जवळ उभा होता आणि त्याने ते काय बोलत होते, ते ऐकले.”

“आणि ते काय बोलत होते?”

“ ‘यावर विचार करा व मला कळवा.’ मग ती काहीतरी बोलली आणि तो उत्तरला, ‘ठीक आहे. एवढा खूप वेळ’ नंतर तो गाडीत बसून निघून गेला.

पायरो विचारपूर्वक बोलला, “हे दहा वीसला घडले.”

जापने त्याचे नाक चोळले. “म्हणजे दहा वीसला मिसेस ॲलन अजून जिवंत होती. पुढे काय झाले?”

“सर, मला माहिती झाले ते एवढेच. २२ क्रमांकाचा गाडीचालक साडेदहाला आला आणि त्याने त्याच्या मुलांना त्यांच्यासाठी काही फटाके उडवण्याचे वचन दिले होते. ती मुले आणि म्युजमधील इतर मुलेही त्याची वाट बघत होती .त्याने मुलांना बाजूला केले. मग आसपासचे सर्व लोक त्यांच्याकडे बघत होते. मग सर्वजण झोपायला गेले.”

“आणि कोणीही १४ क्रमांकाच्या घरात शिरतांना दिसले नाही?”

“नाही --- पण म्हणजे कोणी शिरले नाही, असे नाही. पण कोणाला दिसले नाही, एवढे खरे.”

जाप बोलला, “हं. खरे आहे. या ‘सैन्यात असल्यासारखा दिसणाऱ्या व टूथब्रशसारख्या मिशा असलेल्या’ माणसाला शोधून काढले पाहिजे. पण तिला जिवंत बघणारा तो शेवटचा माणूस होता, एवढे नक्की. मला नवल वाटते, तो कोण असेल?”

पायरो म्हणाला, “मिस प्लेंडरलिथ कदाचित आपल्याला सांगू शकेल.”

जाप मलूलपणे बोलला, “कदाचित ती सांगू शकेल. तर कदाचित नाही. तिच्या मनात असेल, तर ती आपल्याला बरेच काही सांगू शकेल. काय रे पायरो, म्हाताऱ्या, तुझे काय? तू तिच्याबरोबर काही वेळ एकटा होतास. तू तिच्यावर पपा पायरोचा प्रभाव पाडू शकला नाहीस का? गुन्हेगारांना घडाघडा बोलायला लावायचे, ते तुझे हुकमी अस्त्र आहे.”

पायरोने त्याचे हात पसरले. “अरेरे, आम्ही फक्त गॅसच्या आगीबद्दल बोललो.”

“गॅसच्या आगीबद्दल --- गॅसच्या आगीबद्दल” जाप वैतागलेला दिसला. काय रे म्हाताऱ्या, तुला काय झाले आहे? इथे असल्यापासून तू कशात रुची दाखवली असशील, तर पिसाच्या पेनात आणि कचऱ्याच्या बादलीत! ओहो, हो, मी तुला खाली कुतुहलाने बघतांना पाहिले. त्यात काही आहे का?”

पायरोने सुस्कारा टाकला. “जुने बल्ब आणि मासिकांची यादी.”

काही झाले तरी, काय कल्पना आहे? जर एखाद्याला गुन्हेगारी कागदावरून पकडायचे असले, तर तो कचऱ्याच्या बादलीत जायला नको, असे काही तुझ्या मनात आहे का?”

पायरो शांतपणे बोलला, “तू म्हणतोस, त्यात तथ्य आहे. पण काही बिनमहत्वाचे, असेच फेकले जाऊ शकते.”

पण तरी जाप त्याच्याकडे संशयाने बघत होता. तो म्हणाला, “मला माहिती आहे, मी आता पुढे काय करणार आहे. तुझे काय?”

पायरो म्हणाला, “अरे मित्रा, मी बिनमहत्वाचा माझा शोध पूर्ण करतो. अजून कचऱ्याची बादली इथे आहे.” उद्वेग आल्यासारखा पायरो झटपट खोलीबाहेर पडला. तो म्हणाला, “पण ती बादली म्हणजे जणू लहान मुलांचे शी करायचे साधन, फक्त लहान मुलांचे शी करायचे साधन आहे!”

इन्स्पेक्टर जेम्सनने त्याचा मान राखून शांतता ठेवली. ब्रिटीश अहंमन्यपणा दाखवत, तो बोलला, “हे परदेशी लोक!” तो मोठ्याने म्हणाला, “मिस्टर हर्क्युल पायरो असा आहे तर! मी त्याच्याबद्दल ऐकले आहे.”

जाप म्हणाला, “माझा जुना मित्र आहे. तुला सांगून ठेवतो, तो दिसतो त्याच्या अर्ध्यानेही सुखावह नाही. पण तरीही तो काहीतरी शोधून काढतो आहे.”

इन्स्पेक्टर जेम्सनने सुचवले, “ते म्हणतात, तसा त्याचा स्वतःच्या मनावर ताबा नाही. ओहो, वयामुळे असेल.”

जाप म्हणाला, “बरोबर आहे. तो काय करतो आहे, ते मला समजले असते तर!”

तो लिहायच्या टेबलाशी चालत गेला आणि रत्नजडीत हिरव्या पिसाच्या पेनाकडे रोखून बघू लागला.

## सात

जाप तिसऱ्या गाडीचालकाच्या बायकोशी बोलत होता. तेव्हा पायरो मांजरासारखा गुपचूप आवाज न करता, अचानक तिथे हजर झाला.

जाप दचकून बोलला, "तू तर मला उडी मारायला लावलीस. काही सापडले का?"

"मला जे हवे होते, ते नाही सापडले."

जाप मिसेस जेम्स हॉगकडे वळला, "आणि तुमचे म्हणणे आहे, की तुम्ही यापूर्वी या माणसाला पाहिले आहे?"

"हो, सर. मी आणि माझ्या नवऱ्यानेही. आम्ही त्याला लगेच ओळखले."

"आता इकडे बघा, मिसेस हॉग, तुम्ही गर्विष्ठ बाई आहात, हे मला दिसते आहे. मला काही संशय नाही की तुम्हाला म्युजमधील सर्वांबद्दल सगळी माहिती आहे. ते मला कळते --- " न लाजता त्याने तिसऱ्यांदा तोच शेरा मारला. मिसेस हॉग थोडीशी चमकली व आपण फार बुद्धिमान श्रेष्ठ बाई असल्याचे भासवू लागली. "मला मिसेस ॲलन आणि मिस प्लेंडरलिथ या दोघींबद्दल सांगा. त्या कशा होत्या? आनंदी? सारख्या पार्ट्या देणाऱ्या? कशा होत्या?"

"ओहो, तसे काहीच नाही. त्या बऱ्यापैकी बाहेर जायच्या --- विशेषतः मिसेस ॲलन. पण दोघी छान होत्या. मला काय म्हणायचे आहे, तुम्हाला समजले असेल. काही बायका असतात, तशा दुसऱ्या टोकाच्या नव्हत्या. माझी खात्री आहे, मिसेस स्टीव्हन्सन सांगते, त्याप्रमाणे --- जर ती

खरोखर मिसेस असेल तर, ज्याबद्दल मला संशय आहे --- तिथे काय चालत असे, ते तुम्हाला सांगायला मला आवडणार नाही --- मी – “

जाप तिचा बोलण्याचा ओघ थांबवत बोलला, “असेलही. पण तुम्ही जे सांगितले, ते महत्वाचे आहे. मिसेस ॲलन आणि मिस प्लेंडरलिथ चांगल्या होत्या, पुढे?

“हो, सर दोघीही चांगल्या होत्या --- विशेषतः मिसेस ॲलन. नेहमी मुलांशी छान बोलायची. मला वाटते, तिची स्वतःची छोटी मुलगी वारली होती. बिचारी! तिला तर मीच पुरले. आणि मी काय म्हणते --- “

“हो. हो फार वाईट! आणि मिस प्लेंडरलिथ?”

“हो, ती पण चांगली बाई आहे. पण जरा फटकळ. मान हलवेल आणि वेळ घालवायला थांबेल, तिच्याविरुद्ध असे काहीच नाही.”

“तिचे आणि मिसेस ॲलनचे पटायचे का?”

“हो, सर. भांडणे नाहीत. त्या आनंदी आणि समाधानी असायच्या. माझी खात्री आहे, मिसेस पिअर्ससुद्धा हेच सांगेल.”

“हो, आम्ही तिच्याशी बोललो. तुम्हाला मिसेस ॲलनचा नियोजित वर बघून, माहिती आहे का?

“ती ज्याच्याशी लग्न करणार होती, तो? ओहो हो. तो इथे वरचेवर येत असे. ते म्हणत असत, तो संसद सदस्य होता.”

“काल रात्री आलेला तो नव्हता?”

“नाही, सर. तो नव्हता. मिसेस हॉग उठली. तिच्या आवाजातील खूप शांतपणामागे उद्दीपित उबग दडलेली होती. ”सर, तुम्ही मला विचाराल, तर तुम्ही जो विचार करत आहात तो सर्व चुकीचा आहे. माझी

खात्री आहे, मिसेस ॲलन तशा प्रकारची बाई नव्हती. हे खरे आहे, की घरात कुणी नव्हते. पण माझा असल्या गोष्टींवर विश्वास नाही. मी माझ्या नवऱ्याला सकाळी हेच म्हटले. "नाही, हॉग. मिसेस ॲलन खरी बाई होती. तेव्हा काहीही सुचवू नका. माणसाचा स्वभाव काय असतो हे जाणलेत, तर मी हे म्ह्टल्याबद्दल तुम्ही मला माफ कराल. माझ्या कल्पना नेहमी थोड्या टोचणाऱ्या व खडबडीत असतात."

हा अपमान ऐकून जाप पुढे बोलला, "तुम्ही त्याला येतांना व जातांना बघितलेत, बरोबर ना?"

"हो, सर."

"आणि अजून काही तुम्ही ऐकले नाही?" काही भांडणांचे आवाज वगैरे?"

"नाही, सर. तसे काही नाही. नाही म्हणजे असल्या गोष्टी ऐकू येणे शक्य नसते --- कारण त्याने कीर्तीला बट्टा लागू शकतो --- आणि दुसऱ्या टोकाला ती बिचारी मिसेस स्टीव्हन्स --- बिचारी घाबरलेली नोकराणी सतत बोलणी खात असायची --- आम्ही तिला किती वेळा सांगितले, की हे सहन करत जाऊ नकोस. पण शेवटी पगार चांगला होता. आठवड्याला तीस शिलिंग --- "

जाप लगेच म्हणाला, "पण तुम्ही असले काही १४ क्रमांकाच्या घरात ऐकले नाही ना?"

"नाही, सर. इकडे तिकडे फुटणाऱ्या फटाक्यांच्या आवाजात काही ऐकणे शक्य नव्हते. आणि माझ्या एडीच्या भुवया जेवढ्या वर चढणे शक्य होते, तेवढ्या चढल्या होत्या.

“पण तो माणूस दहा वीसला गेला हे नक्की?

“असे असावे, सर. मी स्वतः सांगू शकत नाही, पण हॉग म्हणतो आणि तो अगदी विश्वासार्ह माणूस आहे.”

“पण तुम्ही त्याला निघतांना बघितलेत ना? तो काय म्हणाला, ते तुम्ही ऐकले का?”

“नाही, सर. ते ऐकू येण्याइतकी जवळ मी नव्हते. मी त्याला खिडकीतून पाहिले. तो दारात मिसेस ॲलनशी बोलत उभा होता.”

“तिलाही पाहिले का?”

“हो, सर. ती थोडी दाराच्या आत उभी होती.”

“तिने काय कपडे घातले होते, ते काही लक्षात आले का?”

“खरे तर मला सांगता येणार नाही. फार काही लक्षात येतील, असे नव्हते.”

पायरो म्हणाला, “ तिने दिवसाचे कपडे घातले होते की रात्रीचे? की ते देखील लक्षात आले नाही?”

“नाही सर, मी सांगू शकत नाही.”

पायरोने विचारपूर्वक वरच्या खिडकीत पाहिले व नंतर १४ क्रमांकाकडे पाहिले. तो हसला. क्षणभर त्याला जाप दिसला.

“आणि तो मनुष्य?”

‘तो गडद निळ्या सुटात आणि क्रिकेटमधील क्षेत्ररक्षणाच्या टोपीत होता. खूप हुशार व स्थिरस्थावर झालेला होता.

जापने अजून काही प्रश्न विचारले आणि मग तो त्याच्या पुढच्या मुलाखतीकडे वळला. ही फ्रेडरीक हॉग, या मुलाबरोबर होती. तो मिश्कील चेहऱ्याचा, तेजस्वी डोळयांचा मुलगा स्वाभिमानाने फुगलेला होता.”

मास्टर हॉग थोडया नाराज आवाजात म्हणाला, “हो, सर. मी त्यांना बोलतांना ऐकले. ‘यावर विचार करून मला कळव.’ तो मनुष्य म्हणाला. तो आनंदी दिसत होता. मग ती काहीतरी बोलली. ’ठीक आहे. इतके लांब.’ मग तो गाडीत बसला. मी त्याच्यासाठी दार उघडून धरले होते. पण त्याने मला काहीही पैसे दिले नाहीत आणि निघून गेला.”

मिसेस ॲलन काय बोलली, ते तू ऐकले नाहीस का?”

“नाही, सर.”

“तुम्ही मला हे सांगू शकाल का, की तिने काय कपडे घातले होते? उदाहरणार्थ कुठल्या रंगाचे?”

“मला नाही सांगता येणार. मी खरे तर तिला पाहिले नाही. ती दारामागे असावी.”

जाप म्हणाला, “तसे होते. माझ्या मुला, आता इकडे बघ. माझ्या पुढील प्रश्नाचे उत्तर थोडा काळजीपूर्वक विचार करून दे. जर तुला माहिती नसेल वा आठवत नसेल, तर तसे सांग, समजले?

“हो, सर.”

मास्टर हॉगने त्याच्याकडे उत्सुकतेने पाहिले.

“दार कोणी लावले, मिसेस ॲलनने की त्या माणसाने?”

“पुढचे दार?”

“हो, अर्थात पुढचे दार.”

मुलाने विचार केला. विचार करतांना त्याचे डोळे बारीक झाले.

“मला वाटते, बहुधा त्या बाईने लावले --- नाही. तिने नाही. त्याने लावले. धाडकन लावले व पटकन उडी मारून गाडीत बसला. असे दिसत होते, की त्याला कुठेतरी जायची घाई होती.”

“ठीक आहे, मुला, तू चांगला हुशार दिसतोस. तुझ्यासाठी, या घे सहा पेनी.”

जाप त्याच्या मित्राकडे वळला. एकमेकांकडे बघून, त्यांनी मान हलवली.

जाप बोलला, “असेलही.”

पायरोने संमती दर्शवली, “तिथे शक्यता आहेत.” त्याचे मांजरासारखे हिरवे डोळे चमकले.

## आठ

परत ते १४ क्रमांकाच्या घराच्या उठाबसायच्या खोलीत आले. आता फारसा वेळ न घालवता, जाप सरळ मुद्द्यावर आला.

“आता असे बघा मिस प्लेंडरलिथ, आता इथल्या इथे या प्रकरणाचा काय तो निकाल लावून टाकावा, असे तुम्हाला वाटत नाही का? म्हणजे मग या प्रकरणाचा शेवट होईल.”

जेन प्लेंडरलिथने तिच्या भुवया उंचावल्या. ती तिच्या एक पायाला उब देत शेकोटीपाशी उभी होती. “म्हणजे तुम्हाला काय म्हणायचे आहे, ते मला समजत नाही.”

“खरेच का, मिस प्लेंडरलिथ?”

तिने तिचे खांदे शहारवले. “मी तुमच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. आता अजून मी काय करू शकते?”

“जर तुम्ही ठरवले, तर अजून बरेच काही करू शकता.”

“पण हे फक्त माझे मत आहे, नाही का, मुख्य इन्स्पेक्टर?

जापचा चेहरा लाल झाला.

पायरो बोलला, ‘मला वाटते, जर तुम्ही आता केस कुठपर्यंत येऊन पोचली आहे, हे बाईसाहेबांना सांगितलेत, तर ते जास्त बरे राहील.”

“ते अगदी साधे आहे. मग आता मिस प्लेंडरलिथ, यातील मुद्दे खालीलप्रमाणे आहेत. तुमची मैत्रीण हातात पिस्तुल व डोक्यातून आरपार गोळी गेलेल्या अवस्थेत सापडली. दार व खिडकी बंद होते. म्हणजे ही सरळसरळ आत्महत्येची केस वाटत होती. पण ती आत्महत्या नाही. एकटा वैद्यकीय पुरावा तसे सुचवतो आहे.”

“कसे काय?”

पायरो म्हणाला, “मला वाटते, तुम्ही केसच्या सर्व बाबी स्पष्ट केल्या तर ते बाईसाहेबाना जास्त बरे पडेल.”

तिचा सर्व विरोध मावळला. ती पुढे झुकून त्याच्या चेहऱ्याकडे उत्सुकतेने बघू लागली.

“तिच्या हातात पिस्तुल होते, पण बोटे त्याभोवती आवळलेली नव्हती. शिवाय पिस्तुलावर तिच्या बोटांचे ठसेही नव्हते. आणि जखमेचा कोन बघता, तिने स्वतःला ती जखम केली आहे, असे समजणे अशक्य आहे. शिवाय तिने काही पत्र वगैरे ठेवले नाही. आत्महत्येची केस असेल तर सहसा असे दिसत नाही. जरी दार बंद असले तरी किल्ली सापडलेली नाही.”

जेन प्लेंडरलिथ वळली व त्यांच्याकडे तोंड करून, एका खुर्चीत बसली.

ती बोलली, “म्हणजे असे आहे तर! मलाही असेच वाटत होते की तिने स्वतःला मारून घेणे अशक्य आहे. कुणीतरी दुसऱ्याने तिला मारले.”

ती एकदोन मिनिटे विचारात हरवून गेली. तिने एकदम तिचे डोके उंच केले. ती म्हणाली, “तुम्हाला काय पाहिजे ते विचारा. मी माझ्या वकुबाप्रमाणे जास्तीत जास्त चांगले उत्तर द्यायचा प्रयत्न करेन.”

जापने सुरु केले. “काल रात्री, मिसेस ॲलनकडे एकजण आला होता. साधारण पंचेचाळीस वयाचा, गडद निळा ओव्हरकोट घातलेला, डोक्यावर टोपी, टूथब्रशसारख्या मिशा, झकपक कपडे आणि स्टँडर्ड गाडी चालवणारा. तुम्हाला तो कोण आहे, माहिती आहे का?”

“माझी खात्री नाही, पण तो मेजर युस्टॅस असावा.”

“तो कोण आहे? त्याच्याबद्दल तुम्हाला माहिती असलेले सर्व काही सांगा.”

“त्याची बर्बाराशी परदेशात, भारतात, ओळख झाली होती. तो एक वर्षापूर्वी परत आला आणि तेव्हापासून तो मधूनमधून आम्हाला भेटतो.”

“तो मिसेस ॲलनचा मित्र होता का?”

जेन कोरडेपणे म्हणाली, “तो तसे समजत असे.”

“तिचा त्याच्याविषयीचा दृष्टीकोन काय होता?”

“मला नाही वाटत, की तिला तो आवडत होता --- खरे तर माझी खात्री आहे, की तिला तो आवडत नव्हता.”

“पण ती त्याला वरवर मित्रासारखे वागवत असे?”

“हो.”

मिस प्लेंडरलिथ, नीट विचार करून उत्तर द्या, “तिला कधी त्याची भीती वाटत असे का?”

जेनने एकदोन मिनिटे विचार केला व नंतर ती म्हणाली, “हो, मला तसे वाटते. तो आला की ती उदास होत असे.”

“तो आणि मिस्टर चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्ट कधी भेटले होते का?”

“फक्त एकदा. मला वाटते, त्यांचे फारसे पटत नसे. म्हणजे मेजर युस्टॅसने स्वतःला जेवढे जमवून घेता येईल, तितके घेतले होते, पण चार्ल्सने नव्हे. जे चांगले नाहीत, त्यांच्याशी चार्ल्सचे कधीच पटत नसे.”

पायरोने विचारले, “आणि मेजर युस्टॅस चांगला नव्हता का?”

ती मुलगी कोरडेपणे म्हणाली, “नाही. नव्हता. फारसा चांगला नव्हता. थोडा अविश्वासार्ह किंवा धोकादायक होता. उच्च सामाजिक दर्जाचा नक्कीच नव्हता.”

“अरेरे --- म्हणजे तो पक्का साहेब नव्हता, असे तुम्हाला म्हणायचे आहे?

जेनच्या तोंडावर अगदी थोडा वेळ हास्य पसरले. पण तिने थंडपणे उत्तर दिले, “नाही.”

“जर मी तुम्हाला असे सांगितले, की तो मनुष्य मिसेस ॲलन यांना ब्लॅकमेल करत होता, तर तुम्हाला फार आश्चर्य वाटेल का?

जाप तिच्यासमोर बसून, तिचे निरीक्षण करत होता.

जेव्हा त्या मुलीने रोखून बघितले व तिचे गाल लाल झाले, तेव्हा त्याचे समाधान झाले. तिने खुर्चीच्या हातावरील तिचा हात हळूच खाली आणला.

“म्हणजे असे होते तर! असा अंदाज न करणारी मी किती मूर्ख होते!”

पायरो म्हणाला, “म्हणजे असे असणे शक्य असल्याचे, तुम्हाला वाटते आहे का?”

मी मूर्ख असल्याने असा विचार केला नाही. बार्बाराने गेल्या सहा महिन्यात खूप वेळा त्याच्याकडून लहानसहान रकमा उसन्या घेतल्या होत्या. मी तिला तिचे पासबुक बघत बसलेले पाहिले होते. तिच्या आमदनीत ती व्यवस्थित राहू शकत असल्याचे, मी पाहिले होते. त्यामुळे मी फारसे लक्ष दिले नाही. अर्थात ती जर काही पैसे कुणाला देत असेल --- “

पायरो म्हणाला, “आणि हे तिच्या सर्वसाधारण बाह्यस्वभावाला धरून होते, हो ना?”

अगदी बरोबर. ती उदास होती. काही वेळा अस्वस्थ असायची. नेहमीपेक्षा अगदी वेगळी वागत होती.”

पायरो हळूवारपणे म्हणाला, “मला माफ करा, पण हे तुम्ही आम्हाला पूर्वी सांगितले होते ना?”

तिचा अधीर हात हलवत, जेन म्हणाली, “ते वेगळे होते. म्हणजे तिला आत्महत्या वगैरे करावी, असे वाटत नव्हते. पण ब्लॅकमेल --- हो. मला वाटते, तिने मला हे सांगायला हवे होते. मी त्याची खांडोळीच केली असती.”

पायरोने विचार केला, ‘खांडोळी नाही तरी चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्टने त्याला चांगला धडा शिकवला असता.’

जेन म्हणाली. “हो, हो. हे खरे आहे.”

जापने विचारले, “हा माणूस त्याना कुठल्या गोष्टीवरून ब्लॅकमेल करत होता, याची तुम्हाला काही कल्पना आहे का?”

मुलीने डोके हलवले. “मला जराही कल्पना नव्हती. बार्बाराच्या बाबतीत अशी काही गंभीर गोष्ट असावी, यावर माझा विश्वास बसत नाही. तर दुसरीकडे --- “ तिने थोडे थांबून, पुन्हा चालू केले, “मला असे म्हणायचे आहे, की बार्बारा काही बाबतीत थोडी मूर्ख होती आणि फार लवकर घाबरून जात असे. खरे तर ब्लॅकमेल करणाऱ्यासाठी ती आयतीच बकरी होती. तो भयंकर दुष्ट!”

तिने शेवटचे दोन शब्द खऱ्या विषारीपणे उच्चारले.

पायरो म्हणाला, “दुर्दैवाने, चुकीच्या मार्गाने गुन्हा घडलेला दिसतो. खरे तर बळीने ब्लॅकमेल करणाऱ्याला मारायला पाहिजे, ब्लॅकमेल करणाऱ्याने बळीला नव्हे.”

जेनने तिची भुवई थोडीशी उंचावली. “नाही -- ते खरे आहे --- पण मी परिस्थितीची कल्पना करू शकते --- “

“जशी की?’

“समजा, बार्बारा दुःखी झाली. तिने तिच्या छोट्याशा पिस्तुलाने त्याला धमकावले असेल. त्याने तिच्याकडून, ते हिसकावून घ्यायला बघितले असेल. आणि असे करताना झालेल्या बाचाबाचीत त्याने तिला ठार मारले असेल. मग आपण काय केले, म्हणून तो घाबरला असेल आणि त्याने मग आत्महत्येचा बनाव रचला असेल.”

जाप म्हणाला, “असेलही. पण यात एक अडचण आहे.”

तिने त्याच्याकडे चौकस दृष्टीने पाहिले.

“मेजर युस्टॅस [ जर तो तो असेल, तर ] काल रात्री इथून दहा वीसला निघाला आणि दारात त्याने मिसेस ॲलनचा निरोप घेतला.”

मुलीचा चेहरा पडला. ”ओहो, अस्स.” ती दोन मिनिटे थांबली. “पण कदाचित तो नंतर परत आला असेल.” ती सावकाश म्हणाली.

पायरो म्हणाला, ‘शक्य आहे.”

जापने चालू ठेवले. “मिस प्लेंडरलिथ, मला सांगा, पाहुण्यांचे स्वागत करतांना मिसेस ॲलन सहसा खाली असे, की वर तिच्या खोलीत असे?”

“दोन्हीकडे असू शके. पण ही खोली सहसा जास्त लोकांची पार्टी असेल किंवा काही विशेष मित्रमंडळी असतील, तर वापरली जात असे. अशी व्यवस्था होती, की बार्बाराची झोपायची खोली मोठी होती आणि ती

ती खोली उठाबसायच्या खोलीसारखीदेखील वापरत असे. माझी झोपायची खोली लहान होती.”

“जर मेजर युस्टॅस ठरवून काल रात्री आले असतील, तर तुम्हाला काय वाटते, कुठल्या खोलीत त्यांचे स्वागत केले गेले असेल?”

“मला वाटते त्यांना इथेच आणले गेले असेल.” ती मुलगी थोड्या डळमळीत स्वराने बोलली. इथे फार जवळीक होत नाही. जर तिला काही चेक वगैरे लिहायचे काम असेल, तर ती बहुधा पाहुण्यांना वरती घेऊन जाते. इथे खाली लिहायची काही साधने नाहीत.”

जापने डोके हलवले.

“चेकचा काही प्रश्न नव्हता. मिसेस ॲलनने काल दोनशे पौंडांची रक्कम काढली होती. आणि अजून तरी आपल्याला ते पैसे घरात सापडलेले नाहीत.”

“म्हणजे तिने ते पैसे त्या दुष्टाला दिले? ओहो, बिचारी बार्बारा! किती बिचारी बार्बारा!”

पायरो खोकला.

“तुम्ही सुचवल्याप्रमाणे, जर तो यदाकदाचित अपघात असेल, तर हा उल्लेखनीय मुद्दा रहातो, की त्याला नियमित उत्पन्न मिळणाऱ्या स्त्रोताला त्याने का मारावे?”

“अपघात? तो अपघात नव्हता. तो फार रागावला आणि तोल सुटून त्याने तिची हत्या केली.”

“असे झाले असेल, असे तुम्हाला वाटते?”

ती तळमळीने म्हणाली, “हो. तो खून होता. खून होता.”

पायरो थंडपणे बोलला, “बाईसाहेब, तुम्ही चुकता आहात, असे मी म्हणणार नाही.”

जाप म्हणाला, “मिसेस ॲलन कुठल्या सिगरेट्स ओढत असे?

“गास्पर्स. त्यापैकी काही पाकिटात आहेत.”

जापने पाकीट उघडले. एक सिगरेट बाहेर काढून, मान हलवली.

पायरो म्हणाला, “आणि तुम्ही?

“त्याच.”

“तुम्ही टर्किश ओढत नाही का?

कधीच नाही.”

“मिसेस ॲलनपण नाही का?”

“नाही. तिला त्या आवडत नसत.”

पायरोने विचारले, “आणि मिस्टर चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्ट, ते कुठली सिगरेट ओढत असत?”

तिने रोखून त्याच्याकडे पाहिले. तो कुठली सिगरेट ओढायचा, याचा इथे काय संबंध आहे? त्याने तिला मारले, असे ढोंग तुम्ही रचू शकत नाही?”

पायरोने खांदे शहारवले. “बाईसाहेब, एक माणूस, जो तिच्यावर पूर्वी प्रेम करत होता, त्याने तिला ठार मारले.”

जेनने तिचे डोके अधीरतेने हलवले. “चार्ल्स कुणाला मारणार नाही. तो खूप काळजी घेणारा मनुष्य आहे.”

“बाईसाहेब, शेवटी सर्व सारखेच आहे. काळजी घेणारी माणसेच फार हुशारीने खून करतात.”

ती त्याच्याकडे बघत राहिली. “पण मिस्टर पायरो, तुम्ही आताच सांगितलेल्या कारणासाठी नव्हे.”

त्याने डोके लवविले. “नाही, ते खरे आहे.”

जाप उठला. “आता इथे मी फारसे काही करू शकेन, असे मला वाटत नाही. मी अजून एकदा चक्कर मारतो.”

“कदाचित ते पैसे बाहेर कुठे फेकलेले आढळले तर? नक्कीच. तुम्हाला कुठे पाहिजे तिथे बघा. माझ्या खोलीतही पाहिजे तर बघा --- जरी बर्बाराने ते तिथे लपवलेले असणे शक्य नाही.”

जापचा शोध झटपट व जास्तीत जास्त सफलतापूर्वक केलेला होता. काही मिनिटात उठाबसायच्या खोलीत सर्व काही तपासले गेले. मग तो वर गेला. जेन सिगरेट ओढत, खुर्चीच्या हातावर बसली होती आणि भुवई उंचावून आगीकडे बघत होती. पायरो शांतपणे, तिचे निरीक्षण करत होता.

“मिस्टर चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्ट आता लंडनमध्ये असेल का?”

“मला माहिती नाही. मला वाटते, तो त्याच्या लोकांबरोबर हॅम्पशायरमध्ये असेल. मला वाटते, मला त्याला कळवायला पाहिजे. मी विसरले, हे किती वाईट आहे!”

“जेव्हा काही दुर्घटना घडते, तेव्हा प्रत्येक गोष्ट लक्षात ठेवणे काही सोपे नाही. शेवटी वाईट बातमी येणारच. एखाद्याला ती फार लवकर ऐकावी लागते.”

मुलगी म्हणाली, “हो, हे खरे आहे.”

जिना उतरतांना, जापच्या पाऊलांचा आवाज ऐकू आला. जेन त्याला भेटायला बाहेर गेली.

“काय कसे काय?”

जापने डोके हलवले.

“मदत होईल, असे काही नाही. मिस प्लेंडरलिथ, मी सर्व घर धुंडाळले. ओहो, मला वाटते, मी फक्त या जिन्याखालच्या कपाटात बघायला हवे होते.”

असे बोलतांना त्याने त्याचे दार उघडायचा प्रयत्न केला.

जेन म्हणाली, “ते कुलुपबंद आहे.”

तिच्या आवाजात असे काही होते, की दोघेजण तिच्याकडे चमकून पाहू लागले.

जाप आल्हादकपणे बोलला, “हो, ते कुलुपबंद असल्याचे दिसते आहे. तुम्ही किल्ली आणाल का?”

मुलगी जणू पुतळा होऊन उभी होती. “माझी खात्री नाही, की ती कुठे असते.”

जापने तिच्याकडे झटपट बघितले. त्याचा आवाज अजूनही आल्हादक व थंड येत होता. “प्रिय मुली, हे वाईट आहे. मला हे जोरात उघडून लाकूड खराब करायचे नाही. मी जेम्सनला बाहेर पाठवून, किल्ल्या मागवतो.

ती बळजोरी केल्यासारखी हलली.

ती उठबसायच्या खोलीत गेली आणि क्षणभरात हातात किल्ली घेऊन परत आली.

तिने स्पष्ट केले, “आम्ही ते कुलुपबंद ठेवतो. कारण एकदा त्यातून छत्र्या चोरीला गेल्या होत्या.”

आनंदाने किल्ली घेत, जाप म्हणाला, “चांगली काळजी घेता.”

त्याने किल्ली फिरवून कपाटाचे दार उघडले. आत काळोख होता. जापने खिशातून विजेरी काढली व आत उजेड पाडला.

पायरोला वाटले की त्याच्याशेजारी उभ्या असलेल्या मुलीचा श्वास क्षणभरासाठी थांबला. त्याचे डोळे जापने उघडलेल्या कपाटाकडे लागले.

कपाटात फार काही नव्हते. तीन छत्र्या --- एक तुटकी, चार चालायच्या काठ्या, एक गोल्फच्या काठ्यांचा संच, दोन टेनिस रॅकेट्स, एक नीट घडी करून ठेवलेला रग आणि फाटत चाललेले खूपसे सोफ्यांचे आभ्रे. हे सर्व सोडून, अजून एक आडवी पडलेली, व्यवस्थित दिसणारी लहानशी बॅग.

जापने ती घेण्यासाठी हात पुढे केला, तेव्हा चटकन जेन म्हणाली, “ती माझी आहे. आज सकाळी ती माझ्याबरोबर आली. त्यामुळे त्यात काही नसेल.”

आनंदीपणे मित्रत्वाचा आवाज थोडा वाढवत जाप म्हणाला, “पण एकदा खात्री केलेली बरी.”

बॅग उघडली. आतमध्ये, शार्कच्या कातडीचे ब्रश व संडासातील स्वच्छता करायच्या बाटल्या होत्या. शिवाय दोन मासिके होती. पण अजून काही नव्हते.

जापने ती पूर्ण बॅग खूप लक्ष देऊन, नीट तपासली. शेवटी जेव्हा त्याने ती लावली, आणि घाईने झाकण तपासले, तेव्हा मुलीने सुटकेचा निःश्वास टाकला.

कपाटात अजून काही नसल्याने जापचा तपास संपला. त्याने कपाटाला कुलूप लावले आणि जेनला किल्ली दिली.

तो म्हणाला, "आता केसचा निकाल लागला. तुम्ही मला मिस्टर चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्टचा पत्ता द्याल का?"

"फार्लेसकॉम्ब हॉल, लहान लेडबरी, हॅम्पशायर."

"मिस प्लेंडरलिथ, मी तुमचा आभारी आहे. आतापुरते हे संपले आहे. नंतर मी कदाचित परत येईन. आणि एक म्हणजे लोकांसाठी मिसेस ॲलनने आत्महत्या केली, असेच सांगा."

"अर्थात. माझ्या लक्षात आले."

तिने दोघांशी हातमिळवणी केली.

ते म्युजमध्ये चालू लागल्यावर जापने स्फोट केला, "त्या कपाटात कायकाय नको ते होते? तिथे काहीतरी होते."

"तू तपासलेस, तरी म्हणतो आहेस, की तिथे काहीतरी होते."

"मी नक्की सांगतो, की त्या बॅगेत काहीतरी होते! पण एखाद्या मूर्खासारखे, मी काही शोधू शकलो नाही. सगळ्या बाटल्या बघितल्या --- झाकण तपासले --- ते बेकार काहीतरी काय बरे असावे?"

पायरोने विचारपूर्वक डोके हलवले.

जाप म्हणाला, “ती मुलगी यात काहीतरी भूमिका बजावते आहे, हे नक्की! उद्या सकाळी परत आपण यावर काम करू, नाही का? नाही, तसे नसेल. त्या बॅगेत दोन मासिके होती, हे तिच्या लक्षात आले नाही?”

हो.”

“त्यातील एक मागील जुलैचे होते.”

**नऊ**

दुसऱ्या दिवशी जेव्हा जाप पायरोच्या सदनिकेत चालत गेला, तेव्हा मोठ्या उद्वेगाने टोपी टेबलावर भिरकावली आणि खुर्चीत बसला. तो गुरगुरला, “ती यातून बाहेर गेली.”

“कोण बाहेर गेले?”

“प्लेंडरलिथ. ती मध्यरात्रीपर्यंत ब्रिज खेळत होती. यजमान, यजमानीण बाई, पाहुणा नौसेना कमांडर आणि दोन नोकर हे सर्वजण ते शपथेवर सांगतील. त्याबद्दल काही संशय नाही. या घडलेल्या प्रकरणाशी तिला काही देणेघेणे असल्याचे दिसत नाही. तसेच मला हे जाणून घ्यायला आवडेल, की कपाटातील त्या लहानशा बॅगेबाबत ती एवढी चिडचिड का करत होती. पायरो, इथे तुझ्यासाठी काही करायची संधी आहे. कुठल्याही निर्णयावर न पोचवणाऱ्या फालतू गोष्टी घेऊन त्या उकलत बसायला तुला आवडते. लहानशा बॅगेचे रहस्य! तुझ्यासाठी छान आहे.”

“मी तुला अजून एक विषय देतो. सिगरेटच्या धुराच्या वासाचे गूढ.”

थोडे विचित्र नाव आहे, नाही का? जेव्हा आपण पहिल्यांदा प्रेत तपासले, तेव्हा तू म्हणूनच शिंकत होतास का? मी तुला पाहिले --- आणि

ऐकलेही ऑ—क्षी, ऑ—क्षी, ऑ--क्षी. मला वाटले डोक्यात तुझी सर्दी साठली आहे.”

“तू पूर्णपणे चुकतो आहेस.”

जापने सुस्कारा टाकला.

“मी नेहमी असा विचार करतो की या मेंदूच्या छोटया करड्या पेशी असाव्यात. मला हे सांगू नकोस, की तुझ्या नाकाच्या पेशी इतर कुणाही पेशींइतक्याच श्रेष्ठ आहेत.”

“नाही. नाही. शांत हो.”

जाप संशय घेत म्हणाला, “मला काही सिगरेटच्या घुराचा वास आला नाही.”

“माझ्या मित्रा, मलाही आला नाही.”

जापने त्याच्याकडे संशयाने पाहिले. मग त्याने खिशातून एक सिगरेट काढली.

“मिसेस ॲलन ओढायची --- गास्पर्स --- तशा प्रकारची ती आहे. यातील सहा थोटके तिची आहेत. इतर तीन टर्किश आहेत.”

“बरोबर.”

“मला वाटते, तुझ्या नवलपूर्ण नाकाला हे न बघताच माहिती होते.”

“मी तुला खात्री देतो, माझ्या नाकाचा यात काही संबंध नाही. नाकाने काही जाणले नाही.”

“पण मेंदूच्या पेशींनी बरेच काही जाणले?”

“हो, काही संकेत मिळाले --- असे तुला वाटते का?”

जापने कडेने त्याच्याकडे पाहिले. “जसे की?”

“ठीक आहे. खोलीतून खात्रीशीरपणे काहीतरी गायब होते. आणि काहीतरी नवीन आले होते, असे मला वाटते --- आणि लिहायच्या टेबलावर –-- ते पिसांचे पेन!”

“मला माहिती आहे --- आपण त्याकडे येत आहोत. पण नाही. पिसांच्या पेनाची यात काहीही भूमिका नाही.

जाप सुरक्षित बाजूकडे वळला.

“मला भेटायला स्कॉटलंड यार्डमध्ये अर्ध्या तासाने मिस्टर चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्ट येतो आहे. मला वाटते, तुलाही तिथे हजर असलेले आवडेल.”

“हो, खूपच आवडेल.”

“आणि हे ऐकून, तू आनंदी होशील, की आम्ही मेजर युस्टॅसचाही मागोवा काढू शकलो. त्याला नोकरीतून, क्रॉम्वेल रस्त्याला सदनिका मिळाली आहे.”

“छान.”

“आपण तिथे जायला हवे. मेजर युस्टॅस अजिबात चांगला माणूस नाही. चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्टला भेटल्यावर आपण त्याच्याकडे जाऊ. तुला हे चालेल ना?”

“अगदी चालेल.”

“चल तर मग.”

## दहा

साडेअकरा वाजता, चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्ट मुख्य इन्स्पेक्टर जापच्या खोलीत शिरला. जाप उठला त्यांनी हातमिळवणी केली.

तो माणूस साधारण मध्यम उंचीचा आणि खास व्यक्तिमत्व लाभलेला होता. त्याने स्वच्छ दाढी केली होती. त्याचे फिरणारे तोंड एखाद्या नटासारखे होते. खासगी चर्चचा सभासद असल्यासारखे थोडे वैशिष्ट्यपूर्ण डोळे होते. तो दिसायला चांगला, शांत व उच्चकुलीन दिसत होता.

तो जरी अशक्त व काहीसा दुःखी दिसत असला, तरी तो पद्धतशीरपणे व शांतपणे वागत होता.

तो बसला. त्याचे मोजे आणि टोपी टेबलावर ठेवले आणि जापकडे पाहिले.

“मिस्टर चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्ट, पहिल्यांदा मला हे सांगायला आवडेल, की तुम्हाला हे सर्व किती उदास करणारे वाटत असेल, याची मी कल्पना करू शकतो.”

मिस्टर चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्टने फारसे लक्ष दिले नाही. “आपण माझ्या भावनांची चर्चा करायला नको. मुख्य इन्स्पेक्टर, मला हे सांगा कुठल्या कारणाने मिसेस ॲलन तिचा स्वतःचा जीव घ्यायला प्रवृत्त झाली?”

“या बाबतीत तुम्ही आम्हाला काही मदत करू शकत नाही का?”

“खरे तर नाही.”

“तुमच्यात भांडण झाले नव्हते? किंवा तुमच्या दोघात, कुठल्याही प्रकारची तणातणी झाली नव्हती?”

“नाही, तसे काहीच नाही. त्यामुळे मला हा फार मोठा धक्का होता.”

“सर, कदाचित मी तुम्हाला जर हे सांगितले, की ही आत्महत्या नसून, खून होता. तर तुम्हाला ते जास्त चांगले समजेल!”

मिस्टर चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्टने डोळे फार मोठे करून म्हटले, “खून? तुम्ही खून म्हणत आहात?”

“बरोबर. आता मिस्टर लॅव्हेरटॉन-वेस्ट, हे कुणी केले असेल, याची तुम्हाला काही कल्पना आहे का?”

लॅव्हेरटॉन-वेस्टने तोंडातून फक्त काही जोरदार आवाज काढले.

“नाही --- नाही, खरेच --- तसे मला काहीच माहिती नाही. मी काही कल्पनादेखील करू शकत नाही.”

“तिने कधी कोण्या शत्रूचा उल्लेख केला होता? पूर्वीच्या एखाद्या घटनेमुळे तिच्यावर संतापलेला कुणी?”

“कधीच नाही.”

“तिच्याकडे पिस्तुल असल्याचे तुम्हाला माहिती होते का?

“हो, माहिती होते.” तो थोडा बावरलेला वाटला.

“मिस प्लेंडरलिथ असे म्हणाली, की मिसेस ॲलनने ते काही वर्षांपूर्वी परदेशातून येतांना आणले होते.”

“खरे की काय?”

“अर्थात हे फक्त मिस प्लेंडरलिथ म्हणते म्हणून, आम्ही धरून चाललो आहोत. असेही असू शकेल, की मिसेस ॲलनला कोणापासून काही धोका वाटला असल्याने, तिने ते जवळ बाळगले असेल.”

मिस्टर चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्टने संशयाने डोके हलवले. तो घाबरलेला वाटत होता. काही विचार करू शकत नव्हता.

“मिस्टर चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्ट, मिस प्लेंडरलिथबद्दल तुमचे मत काय आहे? म्हणजे ती तुम्हाला विश्वासार्ह, खरीखुरी चांगली व्यक्ती वाटते का?”

तो जरा वेळ विचार करून बोलला, “मला तसे वाटते --- हो, तसेच म्हटले पाहिजे.”

जापने त्याचे जवळून निरीक्षण करत सुचवले, “तुम्हाला ती आवडत नसे का?”

“नाही, असे मी म्हणणार नाही. पण मी तिची स्तुती करावी, अशा प्रकारचीदेखील ती नव्हती. ती स्वतंत्र बाई होती. मला काही तिचे आकर्षण नव्हते. पण ती अगदी सच्ची होती.”

जाप म्हणाला, “हं, तुम्हाला कोणी मेजर युस्टॅस म्हणून माहिती होते का?”

“युस्टॅस? युस्टॅस? ओहो, हो, मला ते नाव आठवते आहे. मी एकदा त्यांना बार्बारा --- मिसेस ॲलनकडे भेटलो होतो. तो मला जरा संशयास्पद वाटला. हे मी मिसेस ॲलनच्या दृष्टीने म्हणतो आहे. आमचे लग्न झाल्यावर मी या माणसाला घरी येऊ दिले असते की नाही, हे मला जरा शंकास्पदच वाटते.”

“आणि मिसेस ॲलन काय म्हणत असे?”

“ओहो, तिला ते मान्य होते. ती काही न बोलता माझी मते मान्य करत असे. बाईपेक्षा एक माणूस दुसऱ्या माणसाला जास्त चांगला ओळखतो. तिने स्पष्ट केले होते, की अनेक दिवसात न पाहिलेल्या माणसाबरोबर, ती उद्धटपणे वागू शकत नाही --- अहंमन्यता दाखवायची तिला भीती वाटत असे. आपण असे म्हणू शकतो, की माझी पत्नी म्हणून साहजिकच तिला तिचे पूर्वीचे सहकारी योग्य वाटत नसत.”

जाप निगरगट्टपणे बोलला, “म्हणजे तुमच्याशी लग्न करून, ती तिचे स्थान जास्त चांगले करत होती?”

लॅव्हेरटॉन-वेस्टने त्याचा छान निगा राखलेला हात वर केला. “नाही, अगदी तसेच नाही. खरे तर ॲलनची आई माझ्या स्वतःच्या कुटुंबाशी दूरचे नाते असलेली होती. ॲलन वयाने माझ्याएवढीच होती. पण अर्थात माझ्या स्तराला साजेसे मित्र जमवताना व तिने मैत्रिणी जमवताना विशेष काळजी घेणे गरजेचे होते. प्रत्येकाला काही प्रमाणात, स्वतःचा आब सांभाळावाच लागतो.”

“ओहो, अगदी बरोबर. मी सतत समुद्रावर असतो. बार्बारा! तिचा खून झाला! अशक्य.”

“आता मिस्टर लॅव्हेरटॉन-वेस्ट, पाच नोव्हेंबरच्या रात्री तुम्ही कुठे होतात, हे सांगू शकाल का?”

“मी कुठे होतो? मी कुठे होतो?” त्याचा आवाज स्वतःचा बचाव करण्यासाठी चढला.

जापने स्पष्ट केले, “हे आमचे नेहमीचे काम आहे. आम्हाला प्रत्येकाला हे विचारावेच लागते.”

चार्ल्स लॅव्हेरटॉन-वेस्टने जापकडे आदराने पाहिले. “मला वाटले माझ्यासारख्या उच्च पदावरील व्यक्तीची यातून सुटका असेल.”

जाप थांबून राहिला.

“मी होतो --- आता मी विचार करतो --- आहा, हो. मी घरी होतो. साडेदहाला मी घर सोडले. नदीच्या कडेने फिरायला गेलो. काही आतषबाजी पाहिली.”

जाप आनंदाने म्हणाला, “असा विचार करून बरे वाटले, की हल्ली असले काही बेत नसतात.”

लॅव्हेरटॉन-वेस्टने त्याच्याकडे एखाद्या माशासारखे पाहिले. “मग मी घरी आलो.”

“घरी आल्यावर --- तुमचा लंडनचा पत्ता ओन्स्लो चौक, असा आहे ना? काय वेळ झाली होती?”

“मी पाहिले नाही.”

“अकरा? सव्वा अकरा?”

“हं, तसेच असावे.”

“कदाचित कोणी तुम्हाला दार उघडून आत घेतले असेल.”

“नाही, माझ्याकडे माझी किल्ली होती.”

“चालतांना तुम्हाला कोणी भेटले का?”

“नाही --- खरे तर, मुख्य इन्स्पेक्टर, मला हे प्रश्न फारसे आवडत नाही आहेत.”

“मी तुम्हाला खात्री देतो, ही आमची नेहमीची पद्धत आहे. मिस्टर लॅव्हेरटॉन-वेस्ट, ते व्यक्तिगत नाहीत, हे तुम्हालाही माहिती आहे.”

त्या चिडलेल्या माणसाला या उत्तराने थोडे शांत केले.

“जर हे संपले असेल --- “

“मिस्टर लॅव्हेरटॉन-वेस्ट, आतापुरते, हे संपले आहे.”

“तुम्ही मला काय ते कळवत रहाल --- “

“अर्थात, सर. मला तुमची हर्क्युल पायरोशी ओळख करून देऊ दे. तुम्ही त्याच्याबद्दल ऐकले असेल.”

मिस्टर लॅव्हेरटॉन-वेस्टचे डोळे त्या लहानशा बेल्जियनवर खिळले.

“हो. हो. मी नाव ऐकले आहे.”

पायरो एकदम परदेशी थाटात बोलला, “मिस्टर, माझ्यावर विश्वास ठेवा, माझे हृदय तुमच्यासाठी शोक करते आहे. असला प्रसंग सहन करायला मोठा अवघड आहे. इतके नुकसान! पण मी अजून काही बोलत नाही. किती मोठ्या धैर्याने इंग्रज त्यांच्या भावना दाबून ठेवतात.” त्याने त्याची सिगरेटची डबी बाहेर काढली. “मला परवानगी द्या. आहा, जाप, ही तर रिकामी आहे?”

जापने त्याच्या खिशात हात घातला व डोके हलवले.

लॅव्हेरटॉन-वेस्टने त्याची सिगरेटची डबी काढली व पुटपुटला, “मिस्टर पायरो, ही एक घ्या.”

छोटा माणूस म्हणाला, “आभारी आहे. आभारी आहे.”

दुसरा बोलला, “मिस्टर पायरो, तुम्ही म्हणता तसे, आम्ही इंग्रज आमच्या भावना चव्हाट्यावर मांडत नाही. आमचे ब्रीदवाक्य असे आहे, ‘घट्ट मिटलेला वरचा ओठ.’”

तो दोघांपुढे वाकला आणि बाहेर पडला.

जाप उद्वेगाने बोलला, “खारवलेल्या माशाचा तुकडा आणि शिजवलेले घुबड! मिस प्लेंडरलिथने त्याच्याबद्दल सांगितलेले अगदी बरोबर आहे. तरीपण तो दिसायला चांगला आहे --- एखाद्या विनोदाचे अंग नसलेल्या बाईबरोबर त्याचे जमू शकेल. त्या सिगरेटचे काय?”

पायरोने डोके हलवत, ती दिली.

“इजिप्शियन, महाग प्रकार.”

“नाही, ती चांगली नाही. दयनीय आहे. मी याहून वाईट पुरावा कधी ऐकला नाही --- पायरो, तुला माहिती आहे, का की तो ब्लॅकमेल करणारा दुसरा कुणी नव्हता. जर ती त्याला ब्लॅकमेल करत असती --- तर तो ब्लॅकमेल करायला योग्य व्यक्ती आहे --- त्याने प्रकरण टाळण्यासाठी एखाद्या मेंढीसारखे गुपचूप पैसे दिले असते.”

“माझ्या मित्रा, तुला या केसची जशी पुनर्बांधणी करायची असेल, तशी कर, पण हे सर्वस्वी आपल्या हातात नाही.”

“ते युस्टॅसच्या हातात आहे. मला त्याची थोडी माहिती मिळाली आहे. नक्कीच तो एक फार वाईट माणूस आहे.”

“तसेही, मी तुला सुचवल्याप्रमाणे, तू मिस प्लेंडरलिथच्या बाबतीत केलेस का?”

“हो, एक मिनिट थांब. मी फोन करून ताजी माहिती मागवतो.”

त्याने फोन उचलून, बोलायला सुरवात केली. थोडे संभाषण झाल्यावर, त्याने तो ठेऊन दिला व पायरोकडे बघितले.

पायरो खेदपूर्वक उद्गारला, “फारच निष्ठुर प्राणी! गोल्फ खेळायला गेला आहे. तुमच्या मैत्रिणीचा आदल्या दिवशी खून झाला असेल, तर ही छान गोष्ट आहे.”

जाप बोलला, “आता काय झाले?”

पण पायरो स्वतःशीच पुटपुटत होता, “अर्थात --- अर्थात --- पण हे होणे नैसर्गिक आहे --- मी किती मूर्ख आहे --- का, ते डोळ्यांना खुपले.”

जाप उद्धटपणे बोलला, “उद्दीपित होऊन, भरभर बोलणे थांबव आणि आपण जाऊन युस्टॅसला भेटू.”

पायरोच्या चेहऱ्यावरील तेजस्वी किरणे बघून, तो आश्चर्यचकित झाला.

“पण --- हो --- नक्की खात्रीपूर्वक आपण त्याला फैलावर घेऊ. कारण आता आपल्याला सर्व काही माहिती आहे --- सर्व काही!”

## अकरा

मेजर युस्टॅसने जगमित्र असल्यासारखे त्या दोन माणसांचे सहजतेने खात्रीपूर्वक स्वागत केले.

त्याची सदनिका लहान होती. त्याने स्पष्ट केल्याप्रमाणे फक्त झोपण्याइतकी! त्याने दोघांना पेय दिले आणि जेव्हा ते नाकारले गेले, तेव्हा त्याने त्याची सिगरेटची डबी काढली.

जाप आणि पायरो दोघांनी सिगरेट घेतली. त्यांच्यात नजरानजर झाली.

त्याची सिगरेट बोटात धरत जाप म्हणाला, “तू टर्किश ओढतोस तर!”

“हो, माफ कर. तुला गास्पर हवी आहे का? माझ्याकडे एक कुठेतरी आहे.”

“नाही. नाही. मला ही चालेल.” मग तो पुढे वाकला --- त्याचा स्वर बदलला. “मेजर युस्टॅस, कदाचित तू तर्क करू शकशील, की मी कशासाठी आलो आहे?”

मेजरने मान हलवली. त्याची पद्धत तो शांत व मोकळा असल्याचे दाखवत होती. मेजर युस्टॅस उंच माणूस होता. थोड्या राकट पद्धतीने दिसायला चांगला होता .त्याच्या लहान, लबाड डोळ्यांभोवती फुगीरपणा होता. ते डोळे त्याच्या हसऱ्या, मित्रत्वाच्या भासणाऱ्या, विनोदीपणाच्या बुरख्यामागे खरे तर खुनशी होते.

तो म्हणाला, “नाही --- मला काही कल्पना नाही. मुख्य इन्स्पेक्टरने मला भेटायला यावे, असे काय घडले आहे? माझ्या गाडीबद्दल काही आहे का?”

“नाही. गाडीबद्दल नाही. मेजर युस्टॅस, मला वाटते, तुम्हाला मिसेस बार्बारा ॲलन माहिती आहे?

मेजर मागे टेकून बसला. सिगरेटचा झुरका मारला आणि ट्यूब पेटल्यासारख्या आवाजात म्हणाला, “ओहो, म्हणजे हे असे आहे तर! अर्थात मी हे ओळखायला हवे होते. फार वाईट झाले.”

“तुम्हाला त्याबद्दल माहिती आहे का?”

“मी कालच्या वर्तमानपत्रात वाचले. टोकाचे वाईट झाले.”

“मला वाटते, तुमची मिसेस ॲलनशी भारतात ओळख झाली होती.”

“हो, काही वर्षांपूर्वी.”

“तुम्ही तिच्या नवऱ्याला पण ओळखता?”

तिथे काही सेकंद शांतता पसरली --- पण तेवढ्या वेळात त्या डुकराचे डोळे त्या दोघांकडे बघून चमकले. मग तो उत्तरला, “नाही, खरे तर मी केव्हाच ॲलनच्या नवऱ्याला भेटलो नाही.”

“पण तुम्हाला त्याच्याबद्दल थोडीफार माहिती असेल?”

“असे समजले होते, की तो फारसा बरा मनुष्य नाही. अर्थात ती फक्त अफवा होती.”

“मिसेस ॲलन काही बोलली नाही?

“आम्ही कधीच त्याच्याबद्दल बोललो नाही.”

तुमची मिसेस ॲलनशी खूप जवळीक होती का?”

मेजर युस्टॅसने खांदे उडवले.

“आम्ही जुने मित्र होतो. जुने मित्र. पण कधी फारसे भेटत नव्हतो.”

“पण काल रात्री तुम्ही तिला भेटला होतात? पाच नोव्हेंबरच्या संध्याकाळी?”

“हो, भेटलो होतो.”

“मला वाटते तिच्या घरी तुम्हाला बोलावले होते.”

मेजर युस्टॅसने मान हलवली. त्याचा सूर हळूवार, पश्चात्तापदग्ध झाला.

“हो, तिने मला तिच्या गुंतवणुकीसंबंधी काही सल्ला विचारला होता. अर्थात तुमच्या मनात काय आहे, हे मला समजते आहे --- तिची मनस्थिती --- आणि असलेच काही. ठीक आहे. खरे तर, ते सांगणे खूप अवघड आहे. तशी ती नेहमीसारखीच दिसत होती. तरीही आता विचार केला तर ती थोडी अस्वस्थ वाटत होती.”

“पण तिने तुम्हाला ती काय विचार करत होती, त्यासंबंधी काही काही सूचना दिली नाही?

“अजिबात नाही. खरे तर, जेव्हा मी तिचा निरोप घेतला, तेव्हा मी तिला म्हटले, की मी लवकरच तिला फोन करेन. आणि आपण भेटू.”

“तुम्ही तिला फोन करेन म्हणून सांगितले? हे तुमचे शेवटचे शब्द होते का?”

“हो.”

“विचित्र आहे. माझ्या माहितीप्रमाणे तुम्ही काही वेगळे शब्द बोललात.”

युस्टॅस फिका पडला. “असेल. मला नेमके शब्द आठवत नाहीत.”

माझ्या माहितीप्रमाणे, तुम्ही असे म्हणालात, ‘ठीक आहे. यावर विचार करून मला कळव.’ “

असे होय? हो, मला वाटते, तुमचे बरोबर आहे. अगदी तसेच नसेल. मला वाटते मी असे सुचवत होतो, की तिला केव्हा वेळ आहे, ते तिने मला कळवावे.”

जाप बोलला, “अगदी तसेच नसेल, असे?”

मेजर युस्टॅसने खांदे शहारवले. “माझ्या आवडत्या लोकांनो, तुम्ही कुणाकडून एखाद्या प्रसंगी उच्चारलेले शब्दनशब्द काय होते, याची अपेक्षा करू शकत नाही.”

“आणि मिसेस ॲलनने काय उत्तर दिले?”

“ती म्हणाली, की ती मला फोन करेल. म्हणजे मला साधारणपणे असे आठवते आहे.”

“आणि मग तुम्ही म्हणालात, “ठीक आहे. एवढा खूप वेळ!” बहुधा. तसेच काहीतरी.”

जाप शांतपणे बोलला, “तुम्ही म्हणालात की तिने तुम्हाला तिच्या गुंतवणुकीसंबंधी काही सल्ला विचारला होता. तिने तुम्हाला काही कारणाने गुंतवणूक करण्यासाठी नगदी दोनशे पौंड दिले का?”

युस्टॅसचा चेहरा काळा ठिक्कर पडला. तो पुढे वाकून गुरगुरला, “काय तुम्हाला म्हणायचे आहे तरी काय?”

“तिने असे केले की नाही?”

“मिस्टर मुख्य इन्स्पेक्टर, तो माझा प्रश्न आहे.”

जाप शांतपणे बोलला, “मिसेस ॲलनने तिच्या बँकेमधून दोनशे पौंडाची रक्कम काढली होती. काही नोटा पाच पौंडाच्या होत्या. त्या किती होत्या, हे शोधून काढता येईल.”

“तिने तसे केले असेल, तरी त्याचे काय?”

“मेजर युस्टॅस, ते पैसे गुंतवणूक करण्यासाठी होते --- की ब्लॅकमेलसाठीचे होते?

‘ही काहीतरी नको ती कल्पना आहे. अजून पुढे तुम्ही काय सुचवणार आहात?”

जाप त्याच्या पूर्णपणे व्यवहारिक भाषेत म्हणाला, “मेजर युस्टॅस, मला वाटते, या क्षणी मला तुम्हाला हे विचारायला पाहिजे, की तुम्ही मुकाट्याने स्कॉटलंड यार्डला येणार का? आणि तुमचा जबाब देणार का?

अर्थात, याची काही सक्ती नाही. जर तुमची इच्छा असेल, तर तुम्ही तुमचा वकील आणू शकता.”

“वकील? वकिलाशी मला काय करायचे आहे? आणि तुम्ही कशासाठी मला धमकी देत आहात?”

“मिसेस ॲलनच्या मृत्यूच्या संदर्भात, परिस्थिती जाणून घेण्यासाठी आम्ही चौकशी करत आहोत.”

“अरे वा रे वा! तुम्ही असे काही बरळू शकत नाही. कारण ते सगळे मूर्खपणाचे आहे! इकडे बघा. झाले ते असे झाले. मी बर्बाराला फोन करून तिची वेळ मागून घेतली होती.

“ती काय वेळ होती?”

“साधारण साडेनऊ वाजता. मी म्हणेन, आम्ही बसलो व बोललो --- “

“आणि सिगरेटी ओढल्या?”

मेजर ठामपणे बोलला, “हो, सिगरेटी ओढल्या. त्यात कुणाचे काही नुकसान झाले का?”

“हे संभाषण कुठे झाले?”

उठाबसायच्या खोलीत. आत गेल्यावर दाराच्या डावीकडे. आम्ही एकत्र शांतपणे व मित्रत्वाने बोलत होतो. मी साडेदहापूर्वी काही वेळ निघालो. मी दाराशी मिनिटभर काही बोलण्यासाठी थांबलो --- “

पायरो पुटपुटला, “शेवटचे शब्द --- नेमके.”

युस्टॅसने वळून, त्याच्या अंगावर शब्द फेकले, “हे विचारणारे, तुम्ही कोण? कुणीतरी अत्यंत बेकार परदेशी? तुम्ही यात का नाक खुपसत आहात?”

तो छोटा माणूस रुबाबात बोलला, “मी हर्क्युल पायरो.”

“तुम्ही ॲचिलीसचा पुतळा असलात, तरी मी काही पर्वा करत नाही. तर मी म्हणत होतो, की मी आणि बार्बाराने शांतपणे एकमेकांचा निरोप घेतला. मी गाडी चालवत, सरळ फार इस्ट क्लबला गेलो. तिथे अकराला पंचवीस मिनिटे असतांना पोचलो. तिथून वरती पत्ते खेळायच्या

खोलीत गेलो. तिथे दीडपर्यंत ब्रिज खेळलो. आता हे सगळे तुमच्या पाइप मध्ये घालून, तो ओढा.”

पायरो म्हणाला, “मी पाइप ओढत नाही. तुम्ही तिथे गेलात, हा चांगला पुरावा सापडला.”

जापकडे पाहून, तो म्हणाला, “हा तुम्हाला भक्कम पुरावा मिळाला तर! सर, मग आता तुमचे समाधान झाले का?”

“तुमच्या भेटीत पूर्ण वेळ तुम्ही खोलीत बसलेले होतात?”

“हो.”

“तुम्ही वरती मिसेस ॲलनच्या झोपायच्या खोलीत गेला नाहीत?”

“नाही. मी सांगतो, आम्ही पहिल्यापासून एकाच खोलीत होतो आणि तिथेच राहिलो.”

जापने त्याच्याकडे एकदोन मिनिटे विचारपूर्वक पाहिले. मग तो म्हणाला, “तुमच्याकडे कफलींकचे किती संच आहेत?”

“कफलींक? कफलींक? त्याच्याशी तुम्हाला काय करायचे आहे?”

“अर्थात, तुम्ही उत्तर द्यायला काही बांधलेले नाही.”

“उत्तर देऊ? उत्तर द्यायला माझी काही हरकत नाही. मला काही लपवायचे नाही. आणि मी क्षमा मागायची मागणी करेन. तिथे हे आहेत --- “ त्याने त्याचे हात पसरले.

जापने सोने व प्लॅटीनम पाहून मान हलवली.

“आणि माझ्याकडे ही कफलींक आहेत.”

तो उठला. “आणि ही मला मिळाली आहेत.”

तो उठला खण उघडला आणि बॅग बाहेर काढत ती उघडली. जापच्या नाकावर टिच्चून, उद्धटपणे ती ढकलली.

मुख्य इन्स्पेक्टर बोलला, "छान डिझाईन आहे. मला एक मोडके दिसते आहे. थोडे एनॅमल बाहेर आले आहे."

"ते काय आहे?"

"मला वाटते, ते केव्हा झाले, ते तुम्हाला आठवत नाही आहे."

"त्याचे काय?"

"एक दोन दिवसांपूर्वी, फार नव्हे."

"जेव्हा तुम्ही मिसेस ॲलनला भेटायला आलात, तेव्हा हे झाले आहे, हे ऐकून तुम्हाला आश्चर्याचा धक्का बसला असेल."

"का नाही बसणार? मी तिथे होतो, हे मी नाकारलेले नाही." मेजर उच्च आवाजात ओरडला. त्याने ओरडणे चालूच ठेवले. त्याला वाईट वागवले जात असल्याचा राग दर्शवणे, चालूच ठेवले, पण त्याचे हात थरथरत होते.

जाप पुढे झुकून जोरात म्हणाला, "हो, पण कफलींकचा तुकडा खालच्या खोलीत सापडला नाही, तर मिसेस ॲलनच्या वरच्या झोपायच्या खोलीत सापडला. त्या खोलीत जिथे तिला मारण्यात आले. आणि जिथे एक मनुष्य काही वेळ तुम्ही ओढता आहात, त्याच प्रकारची सिगरेट ओढत बसला होता."

हा टोला वर्मी बसला. युस्टॅस खुर्चीत मागे कोसळला. त्याचे डोळे या कडेपासून त्या कडेपर्यंत फिरू लागले. त्या बेकार दांडग्या माणसाचे कोलमडून पडणे आणि घाबरून जाणे, हे काही मोठे मनोहर दृष्य नव्हते.

त्याच्या तारस्वरात तो रडत ओरडत होता, “तुम्ही माझ्यावर काही आरोप करू शकत नाही. तुम्ही मला अडकवायला बघत आहात --- पण तुम्ही हे करू शकत नाही. माझ्याकडे पुरावा आहे --- मी रात्री परत त्या घराशी मुळीच आलो नव्हतो --- “

पायरो बोलला, “नाही, तू त्या घराजवळ परत आला नाहीस --- तुला यायची काही गरज नव्हती --- कारण कदाचित मिसेस ॲलन तू बाहेर पडायच्या आधीच मेलेली होती.”

“हे अशक्य आहे --- अशक्य --- ती दाराच्या थोडी आत उभी होती --- ती माझ्याशी बोलत होती --- लोकांनी तिला बोलतांना ऐकले असेल --- पाहिले असेल --- “

पायरो मवाळपणे बोलला, “त्यांनी तुला तिच्याशी बोलतांना ऐकले --- तिचे उत्तर ऐकण्याचे ढोंग करत थांबणे व परत बोलणे --- ही जुनी युक्ती आहे --- लोकांना वाटले असेल, की ती तिथे आहे, पण त्यांनी तिला पाहिले नाही. कारण त्याना हेदेखील सांगता येत नव्हते, की तिने संध्याकाळचे कपडे घातले होते की नाही --- ते कुठल्या रंगाचे होते, हे सुद्धा ते सांगू शकत नव्हते --- “

“अरे देवा --- हे खरे नाही --- हे खरे नाही --- “

तो आता थरथरत होता व कोलमडून पडला ---

जापने त्याच्याकडे उबग येऊन बघितले. तो ठामपणे म्हणाला, “सर, मला तुम्हाला माझ्याबरोबर यायला विचारायला हवे.”

“तू मला अटक करतो आहेस का?”

“चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे ---असे मी म्हणेन.”

एका लांबलचक शहारे आणणाऱ्या सुस्काऱ्याने, शांतता भंग पावली. आधी जोरजोरात ओरडणारा मेजर युस्टॅस निराशादायक आवाजात म्हणाला, “मी बुडालो --- “

पायरोने त्याचे हात एकमेकांवर चोळले आणि आनंदाने हसला. तो खूप खूष दिसत होता.

## बारा

त्या दिवशी नंतर जाप व्यावसायिक कौतुकाने म्हणाला, “चांगल्या पद्धतीने त्याचा पार बोजवारा उडाला.”

तो आणि पायरो ब्रॉम्पटन रस्त्यावर गाडी चालवत होते.

पायरो अनवधानाने म्हणाला, “त्याचा खेळ संपल्याचे त्याला समजले.”

जाप बोलला, “आपण त्याच्याविरुद्ध बरेच काही गोळा केले होते. दोनतीन चुकीची सोंगे, चेकच्या बाबतीतील फसवाफसवी आणि तो रिट्झमध्ये राहिला, तेव्हा त्याने धारण केलेले कर्नल डे बाथ हे नाव, पिकॅडेलीमधील अर्धा डझन व्यापाऱ्यांना घातलेला गंडा. आपण सध्या त्याला त्या आरोपांखाली अटक करत आहोत --- जोपर्यंत, हे प्रकरण तडीस जात नाही, तोपर्यंत. काय रे म्हाताऱ्या, गावात जाण्याची एवढी घाई का?”

“अरे, कुठलेही प्रकरण अर्धवट टाकून काही उपयोग नाही. सगळे काही स्पष्ट झाले पाहिजे. तू सुचवलेल्या गूढ गोष्टीच्या काठावर मी उभा आहे. ‘हरवलेल्या बॅगेचे गूढ’.

"हरवलेल्या लहान बॅगेचे गूढ' --- अशी ती ओळखली जाते --- मला माहिती आहे, की ती हरवलेली नाही."

"माझ्या मित्रा, थांब."

गाडी म्युजमध्ये शिरली. १४ क्रमांकाच्या दारात, जेन प्लेंडरलिथ गोल्फ खेळायच्या कपड्यात होती. ती छोट्या ऑस्टीन सातमधून उतरत होती.

तिने एकाकडून दुसऱ्या माणसाकडे बघितले व किल्ली काढून दार उघडले.

"तुम्ही आत येणार नाही का?"

"तिने वाट दिली. जाप तिच्या मागोमाग उठाबसायच्या खोलीत गेला. पायरो एकदोन मिनिटे हॉलमध्ये राहिला. तो काही पुटपुटत होता. "काय त्रास आहे! या कोटाच्या हातांमधून बाहेर पडणे किती अवघड आहे!"

एकदोन मिनिटात तो पण त्याचा मोठा कोट काढून आत आला. पण जापचे ओठ त्याच्या मिशांखाली दाबले गेले. त्याने कपाटाचे दार उघडल्याचा पुसट आवाज ऐकला.

जापने पायरोकडे एक प्रश्नार्थक कटाक्ष टाकला. दुसऱ्याने जेमतेम समजल्यासारखी मान हलवली.

जाप थोडक्यात म्हणाला, "मिस प्लेंडरलिथ, आम्ही तुम्हाला अटक करणार नाही."

"आम्ही फक्त हे विचारायला आलो आहोत, की मिसेस ॲलनच्या वकिलाचे नाव तुम्ही आम्हाला सांगू शकाल का?"

“तिचा वकील?” मुलीने मान हलवली. तिच्याकडे कुणी वकील असल्याचेही मला माहिती नाही.”

“ठीक आहे. जेव्हा या घरात तुम्ही तिला भाड्याने ठेवले, तेव्हा करारपत्रक कुणीतरी तयार केले असेल ना?”

“नाही. मला नाही असे वाटत. मी इथे आले तेव्हा भाडे माझ्या नावावर मी घेत असे. बार्बारा मला अर्धे भाडे देत असे. अर्धे मी पागडीतून वळते करून घेत असे. हे तसे फार कायदेशीर नव्हते.”

“अस्स. ओहो, मला वाटते, मग ठीक आहे.”

जेन नम्रपणे म्हणाली, “माफ करा, मी तुम्हाला काही मदत करू शकत नाही.”

जाप दाराकडे जाता जाता म्हणाला, “त्याचे एवढे काही नाही. तुम्ही गोल्फ खेळायला गेला होतात का?”

ती लाजत बोलली, “हो, मला वाटते तुम्ही याला निष्ठुरपणा समजाल का? पण घरात बसण्यापेक्षा, खरे तर त्यामुळे मला बरे वाटते. बाहेर जाऊन काहीतरी केलेच पाहिजे, असे मला वाटते. स्वतःला दमवायला पाहिजे. नाहीतर मी गुदमरेन!” ती हे भावनातिरेकाने बोलली.

लगेच पायरो म्हणाला, “बाईसाहेब, मी समजू शकतो. हे समजून घ्यायला सोपे आहे --- नैसर्गिक आहे. या घरात बसून विचार करत रहाणे --- नाही, ते आनंददायी नसेल.”

जेन थोडक्यात बोलली, “तुम्ही समजू शकता तर!”

तुम्ही कुठल्या क्लबच्या सभासद आहात का?”

“हो, मी वेंटवर्थमधून खेळते.”

पायरो म्हणाला, “आजचा दिवस छान आहे.”

“पण अरेरे, झाडांवर काही तरी पाने शिल्लक असायला हवी होती! एक आठवड्यापूर्वी जंगल चांगले फुललेले होते.”

“पण आजची हवा मस्त आहे.”

जाप बोलला, “मिस प्लेंडरलिथ, शुभ दुपार. आमचा शोध पूर्ण झाला, की आम्ही तुम्हाला कळवूच. खरे तर आम्ही एका माणसाला संशयावरून अटक केली आहे.”

“कोण माणूस?” तिने त्यांच्याकडे उत्सुकतेने पाहिले.

“मेजर युस्टॅस.”

तिने मान हलवली व ती निघून गेली. ती शेकोटी पेटवण्यासाठी खाली वाकली.

म्युजच्या कोपऱ्यावर गाडी आल्यावर जाप बोलला, “ठीक आहे?”

पायरो तोंडभरून हसला.

“हे अगदी साधे होते. यावेळेस किल्ली दारालाच होती.”

“आणि --- “

पायरो हसला. “अरे मित्रा, गोल्फ क्लब गेला --- “

“अर्थात, मुलगी काही मूर्ख नाही. ती कुठेही गेलेली का असेना आणि ती कशीही का असेना?”

पायरोने मान हलवली. “हो, माझ्या मित्रा, लहानशी बॅग!

जापच्च्या पायाने वेग वाढवला. तो म्हणाला, “खड्ड्यात गेली ती बॅग! मला माहिती होते त्यात काहीतरी आहे. पण ते भयंकर काय आहे? मी तर ती बॅग चांगली तपासली होती.”

“माझ्या बिचाऱ्या जाप --- पण हे --- कसे बरे सांगावे, हे होणारच होते, माझ्या प्रिय वॉटसन?”

जापने त्याच्याकडे रागाने एक कटाक्ष टाकला. “आपण कुठे जात आहोत?”

पायरोने त्याच्या घड्याळाकडे पाहिले. “अजून चार वाजले नाहीत. आपण अंधारण्यापूर्वी वेंटवर्थला जाऊ शकतो.”

“तुला असे वाटते का, ती खरेच तिकडे गेली होती?”

“मला असे वाटते --- हो. तिला माहिती असणार, की आपण चौकशी करू. ओहो, हो, आपण ती तिथे गेली होती का, ते बघू.”

जाप गुरगुरला, “ओहो, ठीक आहे. चल.” त्याने गर्दीतून मोठ्या कौशल्याने गाडी काढली. या लहानशा बॅगेच्या केसचा गुन्ह्याशी काय संबंध आहे, हे मला समजत नाही. दोन्हीत मला तरी काही लागेबांधे दिसत नाहीत.”

“माझ्या मित्रा, मी तुझ्याशी सहमत आहे --- दोन्हीचा काही संबंध नाही.”

“मग कशासाठी --- नाही, मला काही सांगू नकोस! आज्ञा कर. तुझी काय ती पद्धत वापर आणि सगळे संपवून टाक. ओहो, आज छान दिवस आहे.”

गाडी जोरात चालली होती. साडेचारनंतर थोड्या वेळाने ते वेंटवर्थ गोल्फ क्लबपाशी आले. आठवड्यातील या दिवशी तिथे फारशी गर्दी नव्हती.

पायरो सरळ मालकापाशी गेला आणि मिस प्लेंडरलिथ इथली सभासद आहे का, असे विचारले. त्याने स्पष्ट केले, की ती उद्या वेगळ्या कोर्समध्ये खेळणार आहे."

मालकाने त्याचा आवाज वाढवला. एका मुलाने कोपऱ्यात उभ्या असलेल्या गोल्फच्या रॅकेट्सच्या गठ्ठ्यातून शोधून, शेवटी J.P. अशी अक्षरे असलेली एक बॅग आणून दिली.

पायरो म्हणाला, "आभारी आहे." तो मुलगा गेल्यावर मग निष्काळजीने वळून पायरोने विचारले, "तिने अजून एक लहानशी बॅग ठेवली नाही का?"

"आज नाही ठेवली. कदाचित क्लबहाऊसमध्ये ठेवली असेल."

"ती आज इथे आली होती का?"

"हो, मी तिला पाहिले."

तिच्याकडे कुठली गोल्फची रॅकेट होती, ते तुम्हाला माहिती आहे का? तिने एक लहानशी बॅग अनवधानाने कुठेतरी ठेवली आणि मग तिला ती कुठे ठेवली, ते आठवेना."

"तिने रॅकेट घेतली नाही. ती इथे आली. बरेचसे बॉल विकत घेतले. भोकात ढकलण्यासाठी असणारी काही आयर्नस विकत घेतली. मला वाटते, तेव्हा तिच्या हातात लहानशी बॅग होती."

आभार मानत, पायरो वळला. त्या दोन माणसांनी क्लबहाऊसला एक चक्कर मारली. थोडे थांबून पायरोने तेथील दृष्य वाखाणले. "काय सुंदर दृष्य आहे, नाही का? काळसर पाईनवृक्ष --- आणि तळे. हो, तळे --- "

जापने त्याच्याकडे एक झटपट कटाक्ष टाकला. "हीच कल्पना का?"

पायरो हसला. "मला वाटते, हे शक्य आहे की कुणीतरी काहीतरी बघितले असणार. मी तुझ्या जागी असतो, तर चौकशी चालू ठेवली असती."

## तेरा

पायरो मागे झाला. खोलीची रचना बघतांना, त्याचे डोके थोडे एका बाजूला कलले. एक खुर्ची इकडे होती व एक तिकडे. हो, हे फार छान होते. आणि आता जापने घंटी वाजवली.

स्कॉटलंड यार्डचा माणूस लगेच आला.

जाप बोलला, "अगदी बरोबर! तुम्ही विश्वासार्ह स्त्रोताकडूनच मिळालेली माहिती ऐका. काल एक तरुण स्त्री वेंटवर्थच्या तळ्यात काहीतरी फेकत होती. तिचे वर्णन जेन प्लेंडरलिथसारखे वाटत होते. आम्ही ते फेकलेले काय ते सहज निघते का, ते बघितले. पण तिथे खूपच पानवेली माजल्या होत्या. पण शेवटी आम्ही ते यशस्वीपणे बाहेर काढले."

"आणि ते काय होते?"

"ती लहानशी बॅग होती. पण का आणि कोणाची होती? हे मला कळत नाही. त्याच्या आत काही नाही. कोण्या तरुण बाईने महाग दिसणारी

कपड्यांची बॅग तळयात का फेकावी? तुम्हाला माहिती आहे का? मला काही कळेना, त्यामुळे मी रात्रभर तळमळत होतो.”

“माझ्या बिचाऱ्या जाप! पण तुला काळजी करायचे कारण नाही. इथे उत्तर येते आहे. आताच घंटी वाजली.”

जॉर्ज, पायरोचा पुरुष नोकर आत येऊन म्हणाला, “मिस प्लेंडरलिथ.”

मुलगी आत्मविश्वासाने खोलीत आली. तिने दोघाना अभिवादन केले.

पायरोने स्पष्ट केले, “मी तुम्हाला इथे यायला सांगितले होते. “इथे बसा. आणि जाप, तू इथे बस. मला तुम्हाला काही बातमी द्यायची आहे.”

मुलगी बसली. ती तिची टोपी बाजूला टाकून, ती अधीरपणे आळीपाळीने दोघांकडे पाहू लागली. “तर मग मेजर युस्टॅसला तुम्ही अटक केलीत तर!”

“हो, सकाळच्या वर्तमानपत्रात तुम्ही ते वाचले असेल.”

“हो.”

पायरो म्हणाला, “सध्या त्याच्यावर साधे आरोप आहेत. मध्यंतरीच्या काळात आम्ही खुनाच्या बाबतीतले पुरावे गोळा करत आहोत.”

“म्हणजे तो खूनच होता?” मुलीने उत्सुकतेने विचारले.

पायरोने मान हलवली. तो बोलला, ‘हो. तो खून होता. एका माणसाने दुसऱ्याचे केलेले जाणूनबुजून केलेले शिरकाण”

ती जराशी शहारली. “नको. नको. तुम्ही ते असे म्हणता, तेव्हा ते भयानक वाटते.”

“हो, ते भयानकच आहे.”

थोडे थांबून तो म्हणाला, “मिस प्लेंडरलिथ, आता मी या घटनेच्या सत्यतेकडे कसा आलो, ते तुम्हाला सांगणार आहे.”

तिने पायरोकडून जापकडे पाहिले. जाप हसत होता. तो म्हणाला, “मिस प्लेंडरलिथ, त्याच्याकडे त्याच्या पद्धती आहेत. त्याला काय म्हणायचे आहे, ते आपण ऐकू.”

पायरोने सुरवात केली, “बाईसाहेब, जसे तुम्हाला माहिती आहे, की मी माझ्या मित्राबरोबर गुन्ह्याच्या ठिकाणी सहा नोव्हेंबरला सकाळी पोचलो. जिथे मिसेस ॲलनचे प्रेत सापडले, त्या खोलीत आम्ही गेलो. ते बघितल्यावर माझ्या मनात अनेक शंकाकुशंका उमटल्या. त्या खोलीत काही विचित्र वस्तू दिसल्या.”

मुलगी म्हणाली, “पुढे बोला.”

पायरो बोलला, “सुरवातीला सिगरेटच्या धुराचा वास आला.”

जाप म्हणाला, “पायरो, तू हे जरा जास्तच सांगतो आहेस. मला कसलाही वास आला नाही.”

पायरो त्याच्याकडे अचानक रोखून बघितले. “खरे आहे. तुला कसलाही शिळा वास येत नाही. मलाही येत नाही. आणि हे फार फार विचित्र होते --- कारण दार व खिडकी, दोन्ही बंद होते आणि ॲशट्रेमध्ये निदान दहा सिगरेटची थोटके पडली होती. हे फार विचित्र होते. फार विचित्र होते, की आताच सिगरेट ओढल्यासारखा ताजा वास येत होता.”

जाप बोलला, “तुला नेहमी छळवादी पद्धतीने गोष्टी शोधायची सवय आहे, त्याप्रमाणेच तू केलेस.”

“तुमचा शेरलॉक होम्स असेच करतो. तो लक्ष वेधून घेतो, रात्रीच्या वेळेचा कुत्र्याचा चौकस प्रसंग लक्षात ठेवतो --- आणि याचे उत्तर आहे, तिथे चौकस प्रसंग घडला नव्हता. रात्री कुत्र्याने काही केले नाही. तेव्हा पुढेः

“पुढची माझे लक्ष वेधून घेणारी गोष्ट म्हणजे मेलेल्या बाईने मनगटावर बांधलेले घड्याळ.”

“त्याचे काय?”

“त्याचे विशेष काही नाही. पण ते उजव्या मनगटावर बांधले होते. माझ्या अनुभवाप्रमाणे घड्याळ हे डाव्या हातावर बांधले जाते.”

जापने खांदे शहारवले. तो काही बोलण्यापूर्वी पायरोने सुरु केले, “पण तू म्हणतोस तसे, त्यात फार विशेष असे काही नव्हते. काही लोक ते उजव्या हातावर बांधणे पसंत करतात. आणि आता मी काही अधिक रुचीपूर्ण गोष्टीकडे येतो. म्हणजे लिहायच्या टेबलाकडे येतो.

जाप म्हणाला, “मला वाटलेच होते.”

“ते फारच उल्लेखनीय, फारच विचित्र होते. दोन कारणांसाठी. पहिले कारण म्हणजे तिथे काहीतरी नव्हते.”

जेन प्लेंडरलिथ बोलली, “तिथे काय नव्हते?”

पायरो तिच्याकडे वळला. “बाईसाहेब, टीपकागद. टीपकागदाच्या पुस्तकाच्या पहिल्या पानावर कोरा, हातही न लावलेला टीपकागदाचा तुकडा होता.”

जेनने खांदे शहारवले. “खरे तर मिस्टर पायरो, लोक कधीकधी फार वापरले गेलेले असे पुस्तक फाडून टाकतात.”

“पण त्याचे ते काय करतात? केराच्या टोपलीत टाकतात, नाही का? पण मी तिथे बघितले. तिथे ते नव्हते.”

जेन प्लेंडरलिथ अधीर झालेली दिसली.

“कारण ते आदल्या दिवशीच टाकले गेले असतील. टीपकागद कोरा होता, कारण त्या दिवशी बार्बाराने काही पत्रे लिहिली नव्हती.”

“पण असे क्वचितच होते. कारण मिसेस ॲलन आदल्या दिवशी संध्याकाळीच पोस्टात गेलेली दिसली. त्यामुळे, ती पत्रे लिहित असणार. ती खालच्या मजल्यावर लिहू शकत नाही --- तिथे काहीच लिहायचे सामान नाही. ती तुमच्या खोलीत जाणे फारसे शक्य वाटत नाही. मग तिने ज्यावर पत्रे लिहिली, त्यांचे काय झाले? हे खरे आहे, की काही वेळेस लोक कचऱ्याच्या टोपलीत टाकण्याऐवजी शेकोटीत टाकतात. पण खोलीत फक्त गॅसची शेकोटीच होती. आणि खालच्या मजल्यावरची शेकोटी आदल्या दिवशी पेटवली गेली नव्हती. तुम्ही सांगितले होते, की ती फक्त तयार करून ठेवली होती आणि तुम्ही नुसती काडी ओढली.”

तो थांबला.

‘आणि अजून एक समस्या. मी सगळीकडे पाहिले. कागद टाकायच्या व केराच्या टोपलीत, पण मला कुठेच वापरलेल्या टीपकागदाचा मागमूस लागला नाही --- हे मला फार महत्वाचे वाटले. असे दिसत होते, की कोणीतरी मुद्दामून, पूर्ण टीपकागद घेऊन गेले. का? कारण त्यावर लिहिलेले आरशात धरून सहज वाचता आले असते.

पण लिहायच्या टेबलासंबंधी अजून एक चौकस मुद्दा होता. जाप, कदाचित साधारणपणे त्याची रचना तुला आठवत असेल का? टीपकागद व शाईचा स्टँड मध्यभागी, डावीकडे पेन ठेवायचा ट्रे आणि उजवीकडे दिनदर्शिका आणि पिसाचे पेन. ठीक आहे, तू पाहिले नाहीस? तुला आठवत असेल ते पिसाचे पेन, मी तपासले. ते फक्त देखावा म्हणून होते --- ते वापरले गेले नव्हते. आहा! अजूनही तुला आठवत नाही? मी परत सांगतो. टीपकागद मध्यभागी, डावीकडे पेन ठेवायचा ट्रे --- डावीकडे बरका, जाप. पण सहसा पेन ठेवायचा ट्रे उजवीकडे असलेला सोयीस्कर पडते, नाही का?

आहा, आता तुला आठवले का? की नाही? पेन ठेवायचा ट्रे डावीकडे --- उजव्या मनगटावर घड्याळ --- टीपकागद तिथे नसलेला --- आणि अजून काहीतरी खोलीत आणलेले --- सिगरेटची थोटके पडलेला ॲश ट्रे!

खोलीत ताजा आणि शुद्ध वास, जाप, अशी खोली जिथे रात्रभर दार व खिडकी बंद असते --- आणि मी एक चित्र रेखाटले.”

त्याने वळून जेनकडे पाहिले.

“बाईसाहेब, तुमचे चित्र! टॅक्सीतून फिरतांना, पैसे देतांना, धावत जिना चढतांना, कदाचित ‘बार्बारा’ असे हाका मारतांना! तुम्ही तुमच्याकडे असलेल्या किल्लीने दार उघडता आणि तुमची मैत्रीण हातात पिस्तुल असलेल्या अवस्थेत --- डाव्या हातात --- तुम्हाला मरून पडलेली दिसते. कारण ती डावखुरी आहे. त्यामुळे गोळी डावीकडून डोक्यात शिरली आहे. तिथे तुम्हाला उद्देशून लिहिलेली चिठ्ठी आहे. ती सांगते की तिने का आत्महत्या केली. मला वाटते, ते फार हलवून टाकणारे पत्र असते --- एक

तरुण, सभ्य, दुःखी बाईने ब्लॅकमेलच्या जाचाला कंटाळून आत्महत्या करत असलेले ---

ताबडतोब मला वाटते, तुमच्या डोक्यात कल्पना चमकली. हे एका विशिष्ट माणसाने केले होते. त्याला शिक्षा व्हायला हवी. पूर्णपणे योग्य अशी शिक्षा! तुम्ही पिस्तुल घेतले, ते पुसले आणि उजव्या हातात ठेवले. तुम्ही चिठ्ठी घेतली व ज्यावर चिठ्ठीतील मजकूर उमटला होता, तो वरचा टीपकागद फाडून टाकला. तुम्ही खाली गेलात. शेकोटी पेटवली आणि दोन्ही जाळात टाकून दिले. मग तुम्ही ॲश ट्रे घेतला -- असे भासवायला, की दोन माणसे तिथे बोलत बसली होती --- शिवाय तुम्ही जमिनीवर पडलेला एनॅमलचा कफलींकचा तुकडाही घेतला. तो तुम्हाला नशीबाने मिळाला व त्याचा तुम्ही फायदा करून घेण्याचे ठरवले. मग तुम्ही दार व खिडकी कुलुपबंद केले. तुम्ही खोलीत शिरून काही कारभार केल्याचे कळायला नको म्हणून हे केले. जसे आता होते, तसे सर्व पोलिसाना दिसले पाहिजे, असे तुम्ही ठरवले. त्यामुळे तुम्ही म्युजमधून कोणाची मदत न मागता, सरळ पोलिसांना फोन केला.

“तर असे सर्व झाले. तुम्ही तुमची ठरवलेली भूमिका शांतपणे व विचारपूर्वक पार पाडली. पहिल्यांदा तुम्ही काही बोलायला नकार दिलात. पण हुशारीने असे सुचवले, की बहुधा ही आत्महत्याच असावी. नंतर तुम्ही आम्हाला मेजर युस्टॅसच्या मागावर धाडलेत ---

“हो, बाईसाहेब, ही हुशारी होती --- फार हुशारीने भासवलेला खून --- तर असे सर्व घडले. मेजर युस्टॅसच्या खुनाचा प्रयत्न.”

जेन प्लेंडरलिथ ताडकन उठली.

"तो खून नव्हता --- तो न्याय होता. त्या माणसाने बार्बाराला मरणांतिक छळले. ती इतकी गोड व असहाय्य होती. तुम्ही बघाल, ती बिचारी भारतात गेली, तेव्हा पहिल्यांदा या माणसाच्या संपर्कात आली. ती फक्त सतरा वर्षांची होती आणि तो तिच्यापेक्षा मोठा विवाहित मनुष्य होता. मग तिला मुलगी झाली. ती तिला अनाथांश्रमात ठेऊ शकली असती, पण तिला ते माहिती नव्हते. ती इथे परत आली आणि --- पोकळ डौल असलेल्या घुबडाच्या --- चार्ल्सच्या प्रेमात पडली. त्याने तिचा अनुनय मोठ्या समाधानाने सुरु केला. जर तो वेगळया प्रकारचा मनुष्य असता, तर मी तिला त्याला सगळे काही सांगायचा सल्ला दिला असता. पण तरीही मी तिला तिची जीभ आवरण्याची विनवणी केली. शेवटी त्याबद्दल मी सोडून कुणालाच माहिती नव्हते.

"आणि तो राक्षस युस्टॅस अवतरला. बाकी तुम्हाला माहिती आहे. त्याने तिला पद्धतशीरपणे छळायला सुरवात केली. शेवटी त्या संध्याकाळी तिच्या लक्षात आले, की या प्रकरणाच्या धोक्यामध्ये चार्ल्सदेखील भरडला जातो आहे. एकदा चार्ल्सशी लग्न झाले, की युस्टॅसला पाहिजे तिथे तो तिला भेटू शकेल --- श्रीमंत माणसाशी लग्न, पण ते प्रकरण केव्हाही सुरु होण्याची भीती! जेव्हा त्याच्यासाठी असलेले पैसे घेऊन युस्टॅस गेला, तेव्हा ती विचार करू लागली. मग तिने मला पत्र लिहिले. ती म्हणाली, तिचे चार्ल्सवर प्रेम आहे आणि त्याच्याशिवाय ती जगू शकणार नाही. पण त्याच्या भल्यासाठी तिने त्याच्याशी लग्न करता कामा नये. ती म्हणली, ती हे योग्य पाऊल उचलते आहे."

जेनने मान मागे टाकली. "मी केले ते का केले, याचे तुम्हाला नवल वाटते का? आणि तुम्ही त्याला खून म्हणता?"

पायरो कडक आवाजात बोलला, “कारण तो खून आहे. कधीकधी खून का केला, हे कारण योग्य असू शकते. पण शेवटी तो खूनच आहे. तुमची मैत्रीण मेली, कारण शेवटी तिला जगायचे धैर्य उरले नाही. आपण तिच्याबद्दल सहानुभूती प्रकट करू शकतो. आपल्याला तिची दया येऊ शकते. पण शेवटी घडलेली गोष्ट घडलेली असतेच --- हे तिचे कृत्य होते --- दुसऱ्या कुणाचे नाही.”

तो थांबला.

आणि तुम्ही? तो माणूस आता तुरुंगात आहे. त्याला इतर कारणांसाठी खूप कालावधीचा कारावास होईल. तुम्ही तुमच्या मनाप्रमाणे त्याला शिक्षा देण्याचा, त्याचे, म्हणजे खरे तर कुठल्याही माणसाचे आयुष्य बरबाद करण्याचा, हक्क गाजवू इच्छिता का?”

तिने त्याच्याकडे रोखून बघितले. तिचे डोळे अंधारमय झाले. अचानक ती बोलली, “नाही. तुमचे बरोबर आहे. मी असे करणार नाही.”

“मग वळून ती खोलीतून सावकाश बाहेर पडली. बाहेरचे दार वाजले ---

## चौदा

जापने एक लांब --- लांबलचक शिट्टी वाजवली. “तो म्हणाला, “मी वैतागून गेलो.”

पायरो बसला व त्याच्याकडे बघून मित्रत्वाने हसला. खूप वेळानंतर शांततेचा भंग झाला. मग जाप बोलला, “खुनाने आत्महत्येचे स्वरूप घेतले नाही, पण पण आत्महत्या खुनासारखी भासवणारी केली गेली होती.”

“हो, पण मोठ्या हुशारीने, कशावरही अती जोर न देता, केली गेली होती.”

अचानक जाप म्हणाला, “पण लहानशी बॅग? ती यात कुठे आली?”

“अरे प्रिय मित्रा, मी तुला आधीच सांगितले, की तिचा काही संबंध नव्हता.”

“मग का --- “

“गोल्फ क्लब. जाप, गोल्फ क्लब. ते डावखुऱ्या लोकांचा गोल्फ क्लब होता. जेन प्लेंडरलिथचा वेंटवर्थ क्लब होता. तो बार्बारा ॲलनचा क्लब होता. आपण जेव्हा ते कपाट उघडले, तेव्हा मिस जेन घाबरली. तिचा सगळा बेत उधळला गेला असता. पण ती चपळ आहे. तिला क्षणार्धात समजले, की ती स्वतःचे पितळ उघडे पाडते आहे. आपण पाहिले, हे तिने पाहिले. त्यामुळे तिने उत्तम गोष्ट केली, ती म्हणजे तिने तो क्षणार्धात विचार केला. तिने चुकीच्या गोष्टीवर आपले लक्ष केंद्रित केले. तिने लहानशा बॅगेचा विषय काढला. ‘ती माझी आहे --- आज सकाळी ती माझ्याबरोबर आली. त्यामुळे त्यात काहीही असेल.’ आणि तिला आशा होती तसेच आपण चुकीच्या दिशेने भरकटलो. त्याच कारणासाठी, जेव्हा दुसऱ्या दिवशी ती गोल्फच्या रॅकेट्स क्लबमध्ये नाहीशा करण्यासाठी गेली होती. तिने लहानशा बॅगेचा विषय --- खूप खपणाऱ्या चंदेरी हेरिंग माशासारखा --- चालूच ठेवला?”

“लाल हेरिंग. म्हणजे तुला म्हणायचे आहे, की खरे उद्दिष्ट होते --- ?”

“माझ्या मित्र, लक्षात घे, गोल्फचे सामान नेऊन टाकायची उत्तम जागा गोल्फ क्लबशिवाय अजून कुठली असू शकत होती? एखादा त्या रॅकेट्स जाळू शकत नाही किंवा कचऱ्याच्या बाद्लीतदेखील टाकू शकत नाही. जर तुम्ही त्या कोणाकडे नेऊन टाकल्यात, तर ते त्या परत करतील. मिस प्लेंडरलिथ त्या गोल्फ क्लबमध्ये घेऊन गेली. तिने स्वतःच्या बॅगेतून भोकात ढकलण्यासाठी असणारी काही आयर्नस काढली. दोन्ही तिथे फेकून दिले. मग ती खूप कप्पे असलेल्या सामानाच्या खोलीत न जाता, गोल फिरत बसली. संशय येणार नाही अशा तऱ्हेने मधल्या वेळात रॅकेट्सचे दोन तुकडे केले व एका खोल खड्ड्यात टाकून दिले. रिकामी बॅगही तळ्यात टाकून दिली. जर कुणी मोडक्या रॅकेट्स इकडेतिकडे पडलेल्या पाहिल्या तरी कुणाला काही वाटले नसते. खेळतांना रागाच्या भरात लोक रॅकेट्स मोडून टाकतांना तिने पाहिलेले होते. हा सुद्धा एक प्रकारचा खेळच होता!

पण तिच्या कृत्यांचा मागोवा घेतला जाईल, याची तिला कल्पना असल्याने, तिने लहानशी बॅग काहीशा नाटकी पद्धतीने तळ्यात टाकली. आणि माझ्या मित्रा, ‘लहानशा बॅगेचे गूढ’ याचे सत्य असे आहे.”

पण तिच्या लक्षात आले की तिच्या कारवायांमध्ये आपल्याला रस आहे, तेव्हा ती तो लाल हेरिंग मासा --- लहानशी बॅग --- तळ्यात प्रेक्षणीय पद्धतीने भिरकावून देते. आणि माझ्या मित्रा, ‘लहानशा बॅगेच्या गूढामागचे’ हे सत्य आहे.”

जापने त्याच्या मित्राकडे काही क्षण शांततेने पाहिले. मग तो उठला, त्याच्या खांद्यावर थोपटले आणि जोरजोरात हसू लागला.

“एका म्हाताऱ्यासाठी काही वाईट नाही. माझ्या शब्दासाठी तू फार उल्लेखनीय काम केलेस. चल आपण बाहेर जाऊन जेवण घेऊ.”

“माझ्या मित्रा, मोठ्या आनंदाने, पण केक नाही तर फ्रेंच पद्धतीचे तेल न घालता केलेले ऑम्लेट व अळंबी, मटार, कांदा व लेट्यूसची भाजी आणि त्यानंतर रम घातलेले केक.”

जाप म्हणाला, “कुठे जायचे ते मला दाखव.”

***समाप्त***

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे पस्तीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*













डॉ. वृषाली जोशी यां


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


Agatha Christie





















## डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)










वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-२



वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE



सॉमरसेटमॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
BEFORE
THE PARTY



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE
STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado
about
Nothing
Twelfth
Night






शेरलॉक होम्स
भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक
कराल ते पुस्तक उघडेल








**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.**

**डॉ. वृषाली जोशी यांचे हे पस्तिसावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची वाढली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३८),

अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३५), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२२), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(९), श्याम कुलकर्णी(७), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(२), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(२), बंकटलाल जाजू (३), पर्वीण दवणे, आर्या जोशी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन

लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।